


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६४ वे * अंक २२७ * नांदेड * रविवार, दि. २४ ऑगस्ट २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

## मनोज जरांगे यांनी कागद अन् पेन घेऊन सरकार समोर आरक्षणाबाबत चर्चेला बसावं; चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी स्थापन करण्यात आलेल्या मराठा आरक्षण उपसमितीमधून आतापर्यंत खूप काही गोष्टी मराठा समाजाला मिळाल्या आहेत. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मागणीतून खूप गोष्टी साध्य झालेल्या आहेत. अशातच मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील आंदोलनाची हाक दिली आहे. तर लोकशाहीमध्ये प्रत्येकाला सनदशीर पद्धतीने आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र असं न करता मुंबईला जाणार, उपोषण करणार असे मनोज जरांगे म्हणत असतील आणि सनदशीर मार्ग सोडून जर ते आंदोलन करत असतील तर सरकार कारवाई करायला बसलेच आहे, असा इशारा उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी मनोज जरांगे



पाटील यांना दिला आहे. तसेच मनोज जरांगे यांनी कागद, पेन घेऊन आरक्षण बाबत सरकार समोर चर्चेला बसायला हवे, असे आवाहन देखील त्यांनी केले आहे.

मराठा आरक्षणासाठी पुन्हा एकदा मनोज जरांगे पाटील आंदोलनाची हाक दिली आहे. मात्र मनोज जरांगेंच्या आंदोलनाआधीच सरकारकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्य सरकारने मराठा समाजाच्या उपसमितीचं पुनर्गठन केलंय. मराठा समाजाच्या उपसमितीच्या अध्यक्षपदी राधाकृष्ण विखे पाटील यांची निवड करण्यात आली. याआधी चंद्रकांत पाटील उपसमितीचे अध्यक्ष होते. जातप्रमाणपत्र देण्यात येणाऱ्या अडचणींबाबत निर्णय प्रक्रिय सुरळीत राबवणे, मराठा आंदोलक आणि शिष्टमंडळाशी चर्चा करणे आदी गोष्टी मंत्रिमंडळ उपसमितीच्या कार्यकक्षेत असणार आहेत. दरम्यान या विषयी बोलताना चंद्रकांत पाटील म्हणाले कि, मराठा आरक्षण बाबत नेमलेल्या उपसमितीवर मी बराच काळ अध्यक्ष होतो, एकाच माणसाने किती वेळ काम करायचं. मात्र समितीत मी आहे. माझ्या कार्यकाळात कित्येक नवीन लोकांना कुणबी प्रमाणपत्र मिळालं असेही ते म्हणाले.

## लाडक्या बहिणींची कोणतीही योजना बंद होणार नाही –फडणवीस

**मुंबई (प्रतिनिधी)–** राज्यातील महिलांना सक्षम करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार कटिबद्ध असून येत्या काळात एक कोटी बहिणींना लखपती दीदी बनविल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. महिलांना त्यांच्या पायावर उभे करण्यासाठी विविध योजना राबवल्या जात आहेत. विरोधक कितीही टीका करोत, पण महिलांसाठी सुरु केलेली कोणतीही योजना पुढील पाच वर्षे बंद होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. भारतीय जनता पार्टीच्या ‘माझा भाऊ देवाभाऊ’ अभियानांतर्गत राज्यभरातील महिलांनी पाठविलेल्या हजारो राख्यांचा सोहळा शनिवारी पार पडला. या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी बहिणींनी दिलेल्या प्रेमाचा स्वीकार करून त्यांना आभार मानले.

## शहराच्या जुना कौठा भागात फायरिंग

### सराईत गुन्हेगार पोलिसांना चकमा देऊन पळाला

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या जुना कौठा भागात आरोपींना पकडण्यासाठी पोलिसांनी फायरिंग केली. यावेळी आरोपी पोलिसांना चकमा देऊन पसार झाले. ही घटना कौठा परिसरातील रवीनगर येथे शनिवार, दि. २३ ऑगस्ट रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास घडली.

शहराच्या जुना कौठा भागात अट्टल गुन्हेगार सुरजसिंघ गाडीवाले व त्याचा एक साथीदार हे चार चाकी गाडीतून कुठल्यातरी गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या उद्देशाने थांबल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना मिळाली. त्यांनी सदरची माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांना कळवून आपले सहकारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे यांच्या पथकाला कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. पथकाने मिळालेल्या माहितीवरून आरोपी सुरजसिंघ गाडीवाले व त्याचा एक साथीदार चारचाकी गाडीत असल्याचे समजताच पोलिसांनी घेराव घातला, परंतु पोलीस आपल्याला पकडतील या भीतीने हे दोन्ही आरोपी चारचाकी गाडी घेऊन पळायला निघाले. यावेळी पोलिसांनी त्यांच्या वाहनाच्या टायरवर फायर केला. मात्र हे दोन्ही आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले. ही घटना रवीनगर कमानीजवळ शनिवार, दि. २३ ऑगस्टच्या रात्री नऊच्या सुमारास घडली. दोन्ही आरोपी मागील काही दिवसापासून फरार आहेत. घटना घडल्यानंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळाला भेट दिली. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

## लोहा पालिका मुख्याधिकारी यांच्या खुर्चीवर लाल रंग

### जादुटोण्याचा संशयावरून मुख्याधिकाऱ्यांची पोलिसांत धाव

**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा नगरपालिका कार्यालयातील मुख्याधिकारी यांच्या गैरउपस्थितीत कुणीतरी लाल रंगाचा पदार्थ त्यांच्या खुर्चीवर टाकला असून तो संशयास्पद आहे. त्यामागचे नेमके कुठले कारण असेल, कुणी जादूटोणा करण्यासारखा प्रकार तर केला नाही ना? असा संशय व्यक्त करत सदर घटनेची सखोल चौकशी करावी, अशी मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांनी लोहा पोलिसांकडे यांनी केली असून याप्रकरणी पालिकेतील चार कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात आली.

आजच्या संगणकीय काळात भारत देश महासत्तेकडे वाटचाल करत असताना लोहा नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना जादूटोण्याची भीती सतावत असल्याची जोरदार चर्चा सध्या लोहा शहरात चर्चेचा विषय बनला आहे. पालिकेच्या काम काजानिमित्त मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे हे नांदेड येथे होते. दुसऱ्या दिवशी ते लोहा पालिकेत कर्तव्यावर हजर झाले. त्यावेळी त्यांच्या खुर्चीवर कुणीतरी लाल रंगाचा पदार्थ (गुलाल) असे काही तरी टाकल्याचे दिसून आले. त्यांनी तेथील काही कर्मचाऱ्यांना सदर घटनेविषयी विचारणा केली, मात्र याचे उत्तर मिळू शकले नाही. तसे त्यांच्या मनात संशय निर्माण होऊन म नात वेगवेगळे प्रश्न निर्माण होऊ लागले. त्या अनुषंगाने त्यांनी पोलिसांत रितसर तक्रार देऊन पालिकेतील चौघांची संशय म्हणून पोलिसांकडे नावे दिली. त्यांची पोलिसांनी चौकशीही केल्याचे समजते. जादुटोणा करण्यासारख्या प्रकाराच्या संशयावरून पालिकेत खळबळ उडाली असून काही जण भीत भीत कामे करत आहेत. तर काही जण हे सर्व थोतांड असून असे काहीं नसते अशी भूमिका घेत असल्याचे पहावयास मिळत आहे. या प्रकारामुळे नगरपालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मी अंधश्रद्धा मानत नाही, जादूटोण्याचा विषय नसला तरी सदर घटना खुर्चीची विटंबना असेल की काय या संदर्भात पोलिसांकडे तक्रार दिली आहे. पोलिसांना मी चौकशीसाठी सर्वोतोपरी सहकार्य करीत आहे. पालिका कर्मचारी व जनतेने अशा अंधश्रद्धा वरती विश्वास ठेवू नये. मी स्वतः दाभोलकरांच्या अभ्यासिकेत अभ्यास केलेला आहे, अशी प्रतिक्रिया मुख्याधिकारी श्रीकांत माळगे यांनी दिली.

## आ. बोंढारकर अपघातातून बालंबाल बचावले

### कुबेर भंडारी दर्शनासाठी जात असताना जालनाजवळ झाला अपघात

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर हे गुजरात राज्यातील कुबेर भंडारी दर्शनासाठी जात असताना त्यांच्या गाडीला जालनाजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात आमदारांसह त्यांच्यासोबतच्या सहकाऱ्यांना दुखापत झाली नसून गाडीचे मात्र मोठे नुकसान झाले आहे.




शुक्रवार दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास ते नांदेडहून निघाले होते. रात्री सव्वा नऊच्या सुमारास आ. आनंदराव बोंढारकर व त्यांचे सहकारी अंगरक्षक हे नांदेडहून कुबेर भंडारीकडे अमावस्यानिमित्त दर्शनासाठी जात होते. त्यांची गाडी जालनाजवळ एका वळणावर येताच समोरून ऑटो चालकाने त्यांच्या गाडीला न पाहताच आपला ऑटो वळविला. यावेळी वेगात असलेल्या गाडीने ऑटोला धक्का मारला. यात ऑटोचेही नुकसान झाले असून आ. बोंढारकरांसह त्यांच्या सहकाऱ्यांना कुठलीही दुखापत झाली नाही. ऑटोमधील प्रवाशांनाही कुठेही दुखापत झाली नाही. त्यानंतर आ. बोंढारकर पुढे कुबेर भंडारी येथे दर्शन घेऊन ते सध्या नांदेडकडे परतत आहेत. मतदारांच्या आणि कुबेर भंडारी यांच्या आशीर्वादामुळे या अपघातातून मी व माझे सर्व सहकारी बचावलो, असे ते म्हणाले.

## ‘नांदेड शहर–सुरक्षित शहर’ या अभियानाअंतर्गत पोलिसांकडून लॉज आणि कॅफे सेंटरची केली तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** ‘नांदेड शहर–सुरक्षित शहर’ या अभियानांतर्गत दि. २३ ऑगस्ट रोजी शहरातील विविध कॅफे व लॉजची तपासणी पोलिसांकडून करण्यात आली. यावेळी ज्या कॅफेमध्ये अनियमितता आढळून आली त्यांना नोटीस व एका लॉज चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आपआपल्या पोलीस ठाणे हद्दीतील लॉजेस, कोचिंग क्लासेस परिसरातील कॅफे तपासणी करून काही गैरप्रकार दिसून आल्यास त्यावर **(पान ५ वर...)**




## पालकमंत्री अतुल सावे यांचा नांदेड दौऱ्यावर

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे हे नांदेड दौऱ्यावर येत आहेत.

रविवार, दि. २४ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता छत्रपती संभाजीनगर येथून वाहनाने शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव. सकाळी १० वाजता अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या अनुषंगाने बैठक. स्थळ: शासकीय विश्रामगृह, नांदेड. सकाळी ११ वाएता शासकीय विश्रामगृह, नांदेड येथून हसनाळ ता. मुखेड जि. नांदेडकडे वाहनाने प्रयाण. दुपारी १२ वाजता हसनाळ ता. मुखेड येथे आगमन व अतिवृष्टी झालेल्या भागाची पाहणी. दुपारी १२.४५ वाजता हसनाळ येथून रावणगाव ता. मुखेडकडे वाहनाने प्रयाण. दुपारी १.१५ वाजता रावणगाव ता. मुखेड जि. नांदेड येथे आगमन व अतिवृष्टी झालेल्या भागाची पाहणी. दुपारी १.४५ वाजता रावणगाव येथून मुक्रमाबादकडे वाहनाने प्रयाण. दुपारी २ वा. मुक्रमाबाद **(पान ५ वर...)**






## वऱ्हाडी कथा

# रंगा

बोट धरून चालवाले शिकोते. रगताचं पानी करुन लेकरायचं पोट भरते अन् थोच बाप जवा म्हतारा निकामी होते तव्हा मातर थ्याले सुन अन पोरगं दारातलं कुतर समजते.

आटपाट नगर होतं. नगराचं नाव आंबेगाव. आंबेगाव हे नाव थ्या गा- वाले पळन्याचं कारण की, थ्या गावात जागोजागी आंब्याचे झाळ. बरं अल्लग अल्लग जातीचे झाळ. थ्या गावातल्या कुटूंबायचा डोलारा आंब्यावरच चाले. बार येन्यापासून त थेट पाळी ये लोग.

ह्याच आंबेगावात रंगा अन झिबा नवरा बायकोले लाळानवसाचं एक लेकरू असते. त्याचं नाव प्रभाकर. दिस मास साल लोटत होते. परभ्या ती ती वाहळत होता. प्राथमिक शिक्षन गावात त्याच्या बादचं माध्यमिक, ऊच्च माध्यमिक अन कॉलेजचं शिक्षन परभ्यानं तालुक्यात घेतलं. परभ्या मायच्या वानावर गेला होता. गोराभराळ, चिरेदार चाफेकईवानी नाक, पसरता रंद माथा, भोकरावानी डोये, मोठमोठे सुपावानी कानं, कुरये कुरये लोखंडी कोयश्यावानी चमचमनारे केस, हलकेसे गुलाबी व्हठ. ऊच्ची पुरा परभ्या दिसाले रूबाबदार दिसे पन् कपळ्यानं गरीब असल्याचा थो दिसून ये. रंगा अन् झिबा जीवतोळूनं दुसऱ्याच्या वावरात राबून पैसा कमवत होते अन् गाडगे बाबांच्या म्हनन्या परमानं परभ्याच्या शिक्षनासाठी खर्च करत होते. शिकता शिकता परभ्या मेकॅनिक इंजिनिअर झाला. नागपूरसारख्या मोठ्या शहरात गेला. रंगा अन् झिबाले वाटे आता सुखाचे दिवस येतीन, आता बसूनं खावू, पन् परभ्याले साजर सालचं पॅकेज असूनही दमडीही थो मायबापाले पाठवे ना. मायबाप पोराची वाट पाहून पाहून थकले होते.

परभ्यानं मायबापाचा ईचार न घेता पेरेम लगन केलं. प्रतिभा अन प्रभाकर एकाच हापिसात काम करत होते. दोघाचा मिळून भरमसाठ पगार येत होता. दोघायनं घर ईकत घेतलं. गुन्यागोविंदानं थे नांदत होते.

पावसायात वावरात जातानी लवनात ईज पळून झिबा मेली. गावातल्या लोकायनं प्रभाकरले फोन करून बलावलं. प्रभाकर आला. तेरवीपर्यंतचे सारे कार्यक्रम अटपून थो गाळीत बसून निंगाला. रंगा आता झोपळीत एकटाच राह्यला होता. पोरगं बी सोळूनू चाल्ल. रंगा पोराची धुळ ऊळवत जाणाऱ्या पाठमोऱ्या गाळीकळे पाह्यत होता. गोठानावर गावच्या पाटलानं आळवं होवूनं परभ्याची गाळी अळोली.

काय बावा परभ्या मोठा मानूस झाला त काय बापाले ईसरला काय? थो रंगा एकला काय करनं अथिसा. तुह्या सोबत थ्याले ही घेवून जाय. लय खचला तुया बुढा लेका. चार चार भाकरी एका टायमाले खानारा तेरा दिवसापासूनं कोरभर भाकरीवर हाय. घेऊन जाय रे बावा तुह्या बापाले. थो माह्या लानपनीचा मैतर असल्यानं थ्याच दुख पाव्हल्या जात नाही माह्या ईकूनं. गावातला राजाराम पाटील बुडा बोल्ला.

अहो पन् काका तेथे नागपूरला अपार्टमेंट आहे. फार मोठी सोसायटी आहे. असे बाबासारखे धोतरं बांडीस टोपी घातलेले कुणीच नाहीत.

परभ्या राजाराम बुड्याले बोल्ला... तितल्यात परभ्याची बायको प्रतिभा मंधातच बोल्ली.

अहो, घ्या ना बाबाला आपल्या सोबत. मुलांनाही जरा विरंगुळा होईल. आपण कामावर गेल्यावर. हो नाही करता करता गाळी मांग भिरली. कौलारू घराजौळ येवूनं थांबली. चला बाबा तयारी करा. आपण नागपूरला जाऊ. तुम्ही आता माझ्याबरोबर रहा. प्रभाकर बोल्ला.

मी काहाले येवू बापा शेरात. माह्य गावच बरं हाय. गाव करे थे राव ना करे. तू जाय बापा मी अथिसाचं बरा हाव. अथिसा झिबाच्या आठोनी हायेत. थ्या आठोनीसंगच जगत जगत मरन. तू जाय बापा सुखी राय. रंगा बोल्ला.

पाटील बोल्ला...अरे! काय हेकळपना करत रंगा राजा. जायनं आता पोरंग चल म्हनते त. जाय ना. काय करशीनं अथिसा एकटा. वावरात मरमर करशीन का भाकरतुकळा करशीनं. आता म्हतारपनात सुख हाय दुख. थकला तू.जायनं बावा सुखात राह्यशीनं. आयक माह्य.

अरे पन् पाटला तथिसा शेरात जावूनं म्या काय कराव. ना आपले लोकं ना आपली भाषा. ना आपला पेहरा ना खानपीनं...रंगा बोल्ला. खानंपीनं ! तेरा रोजा पासूनं पाहूनं राह्यलो त्वा काय खाल्ल त. जाय बावा तथिसा. जसा देस तसा भेस करा लागते ना राजा. अथिसा एकला राहून करशीनं तरी काय. लेकराबाकरात मन रमनं त्वालं. पाटील बोल्ला. गावातले लोकही रंगा ले समजावत होते. पन् रंगाच मन काह्यी केल्या आयकत नोत. ना घर का ना घाट का अशी परिस्थीती चिनभीन रंगाची झाली होती. रंगा आसव धोतराले पुसत घरात गेला. झिबाचं लुगळ खुटीले टांगेल पाहूनं धुमसत लळत होता. घरातलं रंधावन, चुल, भांडेकुंडे पाहूनं सोताशी बळबळ करत होता. किती साजरा संसार होता झिबे. कामून सोळूनं गेली मले एकट्याले. तू कुठ हायेस कशी हायेस. मी जातो आता परभ्याच्या घरी. ऊन्हायात येईनं गावाकळे. रंगानं झीबाचं लुगळ हातात घेतलं. पदरानं डोये पुसले. कपळ्याचं गाठोळ बांधलं. न्हानीत जावूनं हातपाय धुतले. कोरं धोतर बांडीस घातली. गाठोळ हातात घेवूनं आंगनात आला. दाराची साखई लावली. तितल्यात परभ्या बोल्ला. काय हे बाबा. हातात गाठोळ. एखादी बॅग घ्या. रंगा घरात गेला. गाठोळ झो- यात टाकलं. अवघ गाव रंगाले निरोप द्याले गोठानालोग आलं. गाळी डांबरी रसत्यावर लागली. झु ऽऽऽऽ झु पयत चार घंट्यात नाकपूर आलं. सोसायटीत पार्किंग ले गाळी थांबली. वॉचमनन सलाम ठोकला. लिफ्ट मंधी चळले. शेजारचे कुलकर्णी ही लिफ्टमंदी चळले. परभ्या अन् कुलकर्णी ययचे हस्तांदोलन झालं. काय प्रभाकर सर नवीन नौकर आणलेत काय गावाकडूनं.

परभ्या चुपचाप ऊबा होता रंगाचा पारा चळनार तितल्यात पाचव्या मजल्यावर लिफ्ट थांबली. काय रे तुले थ्या मानसाले मी त्वाला बाप हाय हे सांगाची काय लाज वाटत होती काय? अश्या चेंडायन्या मले ज्यमत नाही हा परभ्या सांगून ठुयतो. रंगा परभ्याले बोल्ला. आल आल च लावले काय तंटे. माझ्या मुलांवर काय संस्कार होतील अश्याने. प्रभाकर तुझ्या वडिलांना सांग हे माझे घर आहे म्हणून येथे त्यांचा हुकूम बिलकूल चालणार नाही आणि आवाज सुध्दा मोठ्याने बिलकूल चालणार नाही. प्रतिभा रंगाला उद्देशून बोलली.

बाबा थोडे हळू बोला. लोकं आयकतील तर काय म्हणतील.

लोक गेले गधीच्या गांडीत अन् तूही जाय वदरूनं. मले शिकोतं काय तू. कालचं भोंगय पोट्ट. चला आधी घरात. लोक आयकतील. परभ्या बोल्ला.

घराचं दार खोलल्या गेलं सगळेजण घरात गेले परभ्या थकल्यासारखा वाटत होता बायको किचनमध्ये चहा बनवायला गेली. रंगा कपड्याची थैली घेऊन खाली लादीवर बसला. तद्नंतर सुनेने फक्त परभ्यासाठी चहा आणला. रंगाला चहाची तरफ लागली होती. परभ्यानं त्याच्या कपातल्या थोडा चहा रंगाला दिला रंगा म्हनाला... कुत्र समजून राहिला का मले. परभ्याले बापाचा राग येते. प्रभाकर चहा गट गट प्यायला लागतो. मुलं त्यांच्या रूममध्ये जाऊन खेळायला लागतात. दुपार होते जेवणाचा पत्ता नाही. रंगा पोराले म्हनते. काय रे ब्वा भाकर टुकळा हाय की नाही. प्रतिभा झोमॅटो वरून जेवणाची ऑर्डर देते. प्रत्येकाच्या दोन-दोन चपात्या, थोडी भाजी आणि जीरा राईस असं तिने मागवलं असते.

ताट वाढले जातात. डायनिंग टेबलवर प्रभाकर त्याची दोन मुलं आणि प्रतिभा बसतात. रंगा जमिनीवर बसला होता. प्रभाकरने बापाला आवाज दिला ... बाबा इथे वर बसा ना. रंगा बोलला... मले खालीच बसायची आदत आहे बाबू मले वर बसून जेवन नाही जाणार मी खालीच बसून जेवणार हाय.

सुनबाई न ताट लोटलं आणि बेडरूम मध्ये जाऊन झोपली प्रभाकरही न जेवता उठला आणि बायकोच्या माग माग बेडरूम मध्ये गेला. प्रतिभा काय झालं तुला. प्रभाकर बोलला काय..

हे तुम्ही काय आणलंय गावावरून अक्षरशः घरामध्ये आलो तेव्हापासून कलकल चालू आहे असं जर चालूच राहिलं प्रभाकर तर माझं तुझ्यासोबत राहणं कठीण होऊन जाईल. मला तुला डिवास द्यावा लागेल . अश्याने मुलांवर संस्कार कसे होतीलं. प्रभाकर घाबरला प्रभाकर तन तन रागाने हॉलमध्ये आला आणि त्याने वडिलांचे बकुटे धरून त्यांना खुर्चीवर बसवलं तुम्हाला थोडी सुद्धा अक्कल नाही आणि लाज सुध्दा. मोठ्या शहरांमध्ये काय करावे लागते कस वागाव लागते कवडीमात्र सुध्दा अक्कल नाही तुम्हा खेडूतांना.

चांगले कपडे घालावे लागते डायनिंग टेबलवर काटे चमच्याने जेवावे लागते.. थोडफार इंग्रजी बोलावे लागते...आणि तुम्ही असं भिकाऱ्यासारखं जमिनीवर बसता काय, घाणेरड बोलता काय...हे तुम्ही गाठोड घरातून आणलं तेव्हापासूनच माझं डोकं भडकल आहे.तुम्हाला काही तीळ मात्र सुद्धा अक्कल नाही. इथे वर बसून जेव्हा म्हटलं तर तुम्ही इथे जमिनीवर पालकट मांडून बसले. गावातली पंगत हाय काय? तुम्हाला थोडं सुद्धा कळते का जग कुठच्या कुठे चालला आणि तुम्ही कुठे आहात थोडी सुद्धा अक्कल नाही. आई गेली म्हणून लोकलाजी तुम्हाला इथं आणलं नाहीतर तुम्हाला बिलकुल आणलं नसतं. तळफळ करत तिथेच गावात मेले असते ना तुम्ही. प्रभाकर तनकाराने अगदी राग रागाने बापाला बोलला... रंगाचं काळीज हेलकावल्या गेल् अंग अंग रंगाचं थरथर कापत होतं. रंगा ईचार करत होता. रंगाला सारे दिवस आठवत होते. हेच पोरगं व्हय काय. आम्ही दोघायनं रक्ताचं पाणी करून पोसल, वाळवलं. दिस ना पाह्यला ना रात पाह्यली. मेहनत करून शिकवलं गोडधोड खाल्लं नाही सणासुदीने आम्ही. ना कपळ्याची हौसमौज केली. चिंध्या पांगरल्या आम्ही. पन तुले कमी नाह्यी पळू देल्ल. ज्याच्यासाठी जे सार केलं थो तूच व्होयना की अनखिनं कोनी रंगा ईचार करत होता. डोयाले आसवायची धार लागली होती. डोये अंबाळीच्या बोंडीवानी लाल जरद झाले होते. रंगा ताटकन् ऊठला. प्रभाकरच्या डोयात डोये टाकूनं थ्यानं सवाल केला.

परभ्या त्वाला बाप आज पासूनं मेला. तुह्या दारातलं कुतर होन्यापरीस मी दारोदार भीक मांगूनं खाईनं. पोरगं झालं पोरग झालं म्हणून किती हरिक झाला होता मले. अवघ्या गावात गुय वाटला होता म्या म्याटावानी. बोट धरून चालोनं शिकोलं होत तुले. चिमनीवानी घास भरोले होते तुले. त्वाला गू फेळ्ळा अन थे ही हरकिजानं. त्वा माह्य बखूट धरलं. येवळी हिंमत आली कुठूनं तुले. पैश्याचा माज हाय काय हा सारा. लाज शरम काहाळली त्वा माह्यी. तुह्ये हे शबूद आयकाच्या पयले मी मेलो कामूनं नाही. अवघ्या गावाले माईत हाय. मेयनतीनं ताठ मानीनं जगलो. गावातला एक मानूस कवा हु का चू नाह्यी बोल्ला कधी अन् त्वा मले लाजशरम नाह्यी असा बोल्ला. मले अक्कल नाही! नाही मले अक्कल म्हनून तुले शिकोलं अन् आलो अथिसा तरभळाले. माह्य घर मले सोळेना, झिबाच्या आठोनी मले जावू दे ना... मनावर गोटा ठेवून आलो अथिसा. लखलाभ त्वालं तुले वैभव. मी मातीचा मानूस हाव मातीवरचं बसूनं खाल्ल अन् खानार. चम्चे काटे माह्ये बोटच हाय. आम्हाले जरूरत नाह्यी कोन्या गोठीची.

लखलाभ तुले तुह्यी शिरमंती. हा रंगा वाघा सारखा जगला अन् वाघ-सारखाचं मरनार. तुह्या दारातलं कुतर होनं मले मान्य नाही. रंगा त्या फ्लॅटमधून पायऱ्या उतरत उतरत खाली उतरला आणि रस्ता नेयनं थ्या दिशेने चालाले लागला.

**-सु. पुं. अढाऊकर**
अकोला.
९७६९२०२५९७

---

# अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी

मराठी साहित्यातील अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची २४ ऑगस्ट रोजी १४४ वी जयंती. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते, त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले.

बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फुर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हेही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती.

बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि



उदगारले, अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंनी त्या सर्व कविता आपल्याकडे घेतल्या आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवयित्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण-उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्यप्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा (मियते ) मिळते भाकर...

खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला
मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर
किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर
धरित्रीले दंडवत...

यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यास-क्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहे. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव ताऱ्यासारखे अढळ आहे, म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्यप्रतिभेने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवयित्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांची १४४ वी जयंती आहे. जयंतीदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

---

# पहिला प्रकाश - एक विलक्षण घटना

कोणताही धार्मिक ग्रंथ आपल्याला त्या धर्माचे अंतर्गत आणि बाह्य दोन्ही पैलू जाणवून देतो. धार्मिक ग्रंथ हा एक प्रकारे धर्माचा आरसा असतो. विशिष्ट धर्माची संस्कृती, त्याचा वारसा, संबंधित तत्त्वे आणि नियम, जग, निसर्ग, वाहिगुरू आणि ज्ञानाने भरलेल्या साहित्याचे स्रोत हे त्या धार्मिक ग्रंथात आढळू शकतात.

शीख धर्माचा धार्मिक ग्रंथ 'श्री गुरु ग्रंथ साहिब जी' आहे. या पवित्र धार्मिक ग्रंथाची रचना, संपादन आणि संकलन करण्याची प्रक्रिया जगातील प्रत्येक धार्मिक ग्रंथापेक्षा वेगळी आहे. या धार्मिक ग्रंथाचे संकलन आणि तयारी करण्याचे श्रेय पाचवे गुरु श्री गुरु अर्जन देवजी महाराज यांना जाते.

पंचम पातशाहजींनी त्यांच्या गुरुपदाच्या काळात अनेक महत्त्वाची कामे केली, त्यापैकी सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे 'श्री गुरु ग्रंथ साहिब जी' चे संपादन. गुरुजींनी हे महान काम १६०३ मध्ये सुरू. केले आणि १६०४ मध्ये ते पूर्ण केले.

श्री गुरु ग्रंथ साहिब जींचे सर्वात वेगळे वैशिष्ट्ये म्हणजे, या ग्रंथात शीख गुरु साहिबांच्या आध्यात्मिक वचनांचे संकलन केले गेले असताना, इतर धर्मांच्या भक्तांचे, संतांचे आणि शीख महापुरुषांचे वचन देखील उच्च आदराने दिले गेले. जगाच्या इतिहासातील ही पहिलीच अनोखी घटना आहे आणि धर्माच्या क्षेत्रात सर्वात मोठा बदल घडवून आणणारी घटना आहे. जिथे एखाद्या धर्माचा धार्मिक ग्रंथ तयार केला जात आहे आणि त्या धार्मिक ग्रंथात इतर धर्मांच्या महापुरुषांच्या वचनांनाही स्थान देण्यात आले आहे. विशेषतः त्या भक्त आणि संतांच्या वचनांना ज्यांना त्या काळातील समाज नेहमीच निम्न जातीचे लोक म्हणत असे. पंचम पातशाह जी यांनी 'श्री गुरु ग्रंथ साहिबजी' मध्ये त्या सर्व संत, भक्त जो आणि शिखांच्या वचनांना स्थान दिले आहे आणि त्यांना कायमचे आदराचे स्थान दिले आहे. आज, कोणी शीख किंवा भक्त श्री गुरु ग्रंथ साहिबजी समोर आपले डोके नतमस्तक करतो, तो व्यक्ती देखील सर्व भक्त आणि संतांना आपले डोके नतमस्तक करत आहे, कारण हे पुस्तक संपूर्ण मानवजातीसाठी तयार केले जात होते.

'श्री गुरु ग्रंथ साहिब जी' मध्ये भक्त, संत, गुरु शिख यांच्या बाणीला स्थान देताना, त्यांच्या उच्च गुणांना, कोणत्याही जाती, वंश, प्रांतापेक्षा वर पाहून त्यांना ग्रंथात स्थान देण्यात आले. दुसरे म्हणजे, गुरुजींनी त्यात फक्त तीच बाणी समाविष्ट केली जी अद्वैतवादी, गुरुमतच्या तत्त्वाशी जुळतात.

या पवित्र ग्रंथात ३१ रागांमध्ये ३६ महापुरुषांची बाणी विणण्यात आली आहे. ज्यामध्ये एकूण ५८९४ शब्द आहेत. या पवित्र ग्रंथात ११ भट्टांची बाणी देखील समाविष्ट करण्यात आली आहे. या ग्रंथात, बाराव्या शतकापासून सोळाव्या शतकापर्यंतच्या सुमारे पाच शतकांच्या भक्त आणि गुरुंची बाणी या ग्रंथात संकलित करण्यात आली आहे.

पहिले गुरु श्री गुरु नानक देव जी यांनी त्यांचे उत्तराधिकारी श्री गुरु अंगद देव जी यांना गुरुपद सोपवताना, त्यांनी रचलेली बाणी आणि काही इतर भक्तांची बाणी (जी पुस्तकांच्या स्वरूपात लिहिली गेली होती) त्यांना दिली. हा क्रम चालू राहिला आणि अशा प्रकारे ही सर्व बाणी श्री गुरु अर्जुन देव जी महाराजांपर्यंत पोहोचली. जेव्हा हे महान पुस्तक तयार झाले, तेव्हा ते गोळा केलेले भाग 'बीड साहिब' स्वरूपात बांधून तयार केले गेले. त्यावेळी ते एक मोठे पुस्तक बनले ज्याला 'पोथी साहिब' असे म्हटले जात असे. १६०४ मध्ये (भादरो सुदी एकम) श्री हरिमंदिर साहिब प्रथम अमृतसर साहिबमध्ये प्रकाशित झाले. त्यावेळी बाबा बुड्डा साहिब ग्रंथीच्या जागी सजवले गेले होते. म्हणूनच या ऐतिहासिक घटनेला 'पहिला प्रकाश' असे म्हटले जात असे, तेव्हापासून आजपर्यंत हा पंथ दरवर्षी 'पहिला प्रकाश' म्हणून साजरा केला जातो. हा गुरुपौर्णिमेचा दिवस या महिन्याच्या २४ ऑगस्ट रोजी येत आहे. या पर्वाच्या सर्व जनतेस मनापासून हार्दिक शुभेच्छा.

**-डॉ. विजय सतबीर सिंघ**
प्रशासक
गुरुद्वारा सचखंड बोर्ड, नांदेड

---

# अहंकाराच्या ओझ्याखाली दबलेली माणसं

भारतातील गेल्या दोन दशकांत समाजाच्या आर्थिक पातळीवर मोठा बदल घडून आला आहे. कोट्यवधी भारतीयांनी गरिबीच्या उंबरठ्यावरून मध्यमवर्गीय किंवा उच्च मध्यमवर्गीय जीवनशैलीकडे झेप घेतली आहे. कुणासाठी ही पहिली गाडी आहे, तर कुणी पहिल्यांदाच परदेशवारी अनुभवतोय. काहीजण ब्रँडेड कपड्यांमध्ये मिरवतात, तर काहीजण पगाराच्या आकड्यावर गर्व करतात. हे सर्व प्रगतीचं लक्षण आहे यात शंका नाही. पण ही आर्थिक प्रगती जर मानसिक व भावनिक परिपक्वतेसोबत नसेल, तर त्याचे परिणाम सामाजिक व सांस्कृतिक दृष्टिकोनातून घातक ठरू शकतात. आज आपल्या समाजात अहंकाराची जी लाट उठली आहे, ती केवळ श्रीमंत, शक्तिशाली किंवा उच्चशिक्षित वर्गापुरती मर्यादित राहिलेली नाही. ही मानसिकता आता निम्न व मध्यमवर्गातही दिसून येते. जणू 'मी कोण कमी आहे?' या भावनेने झपाटल्यासारखी परिस्थिती झाली आहे.

**अहंकार म्हणजे नेमकं काय?**

अहंकार म्हणजे केवळ आत्मविश्वास नाही. तो एक बनाव आहे. दुसऱ्यांना कमी दाखवून स्वतःला मोठं सिद्ध करण्याचा अयशस्वी प्रयत्न. यामध्ये असते इतरांच्या मतांबद्दल असहिष्णुता, मार्गदर्शन नाकारण्याची वृत्ती, टोकाची प्रतिक्रिया देणं, खोटा आत्मविश्वास आणि टोकाची आत्मप्रशंसा, खोटं सौजन्य आणि व्यवहारात असलेली उपहासात्मकता, सोशल मीडियावर अतिरंजित प्रदर्शन आणि खोटं वैभव. यातूनच त्यांचं नकली जीवन साकार होत जातं.

**या बदलामागचं खरं कारण काय आहे?**

**१. आर्थिक उन्नती, भावनिक पातळीवर अधोगती**

आपण आर्थिकदृष्ट्या प्रगती केली असली तरी त्याला साथ मिळालेली नाही ती नम्रता, शिस्त, वडीलधाऱ्यांचा आदर, सहकार्याची भावना या भावनिक गुणांची. पैसा आहे, पण परिपक्वता नाही.

**२. सोशल मीडियाचा फसवा आरसा**

इंस्टाग्राम, फेसबुक, लिंक्डइन यांसारख्या माध्यमांवर 'काय दाखवायचं' याला प्राधान्य, आणि 'खरं काय आहे' याकडे दुर्लक्ष होतं. फॉलोअर्स आणि लाईक्स हीच आत्ममूल्याची मोजणी बनली आहे.

**३. शिक्षण, पण माणूसपण हरवलेलं**

शिक्षण पद्धती ही गुणांवर आधारित असल्याने जीवनमूल्ये, भावनिक समज, संवाद कौशल्य यांचं शिक्षण कुठेच होत नाही. स्पर्धा आणि मार्कांच्या मागे लागलेली पिढी 'कसं वागायचं' हेच विसरते.

**४. कार्यालयीन वातावरणात टिकलेली 'बुलबुलं'**

आधुनिक कॉर्पोरेट संस्कृतीतून आलो तरी फीडबॅक स्वीकारण्याची तयारी नाही. अनेक तरुण स्वतःला अपरिहार्य समजतात, आणि मार्गदर्शन नाकारतात.

**तरुणाईत वाढणारा 'मला सगळं कळतं' रोग**

विशेषतः तरुणांमध्ये ही अहंकाराची भावना अधिक प्रकर्षाने दिसून येते. शिक्षण पूर्ण होताच आता मला सर्वकाही माहीत आहे या चुकीच्या समजुतीत ते वावरतात. इंटरनेटवरील माहितीचा अतिरेकी वापर, कृत्रिम बुद्धिमत्तेवर अवलंबून असणं, आणि 'इन्फ्लुएंसर' बनण्याची धडपड. या सर्व गोष्टी त्यांचं वास्तवापासून अंतर वाढवतात.

या गोष्टीमुळे तरुण पिढी अनुभवांना गृहित धरते आणि जुन्या पिढीकडून शिकायला नकार देते. हे अत्यंत धोकादायक आहे कारण ज्ञान, अनुभव, आणि नम्रता यांच्या संतुलनावाचून कारकीर्द टिकत नाही.

**अहंकाराचा सामाजिक परिणाम**

हा अहंकार केवळ वैयक्तिक विकासाचं नुकसान करत नाही, तर तो समाजाच्या एकूण रचनेलाच दुर्बल करतो.

**कुटुंबामध्ये फुट**-पालक आणि मुलांमध्ये संवाद तुटतोय. मुलं पालकांच्या मार्गदर्शनाला मागे टाकतात. भाऊबहिणींच्या नात्यात साहाय्य नव्हे तर स्पर्धा वाढते. नवराबायकोमधील किरकोळ वाद विकोपाला जातात.

**कार्यालयांमध्ये विषारी वातावरण**

जेव्हा अहंकार असतो, तेव्हा सहकार्य हरवतो. कार्यसंस्कृती दूषित होते, टीमवर्क संपतं, आणि स्पर्धा टिकून राहत नाही. समाजात सौजन्य लोप पावतं लोक एकमेकांकडे ऐकण्यापेक्षा बोलून टाकतात. नम्रतेचा अभाव, सहकार्याऐवजी स्वार्थ, आणि समाजात परस्पर विश्वास कमी होतो.

**आर्थिक आणि धोरणात्मक दृष्टिकोनातून धोका**

जगभरातील कंपन्या भारतात गुंतवणूक करतात कारण आपल्याकडे तरुण आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम मनुष्यबळ आहे. पण जर हे मनुष्यबळ अहंकारग्रस्त असेल, तर फक्त कौशल्य असून उपयोग नाही. सांघिक कार्य, शिस्त, सुसंवाद नसेल तर प्रकल्प फसतात, कंपनीचा खर्च वाढतो आणि देशाची प्रगती खुंटते.

**भावनिक बुद्धिमत्तेची गरज**

मोठा अहंकार म्हणजे मोठी कमतरता आत्मसमजुतीची, सहनशीलतेची, आणि सुसंवादाची.

स्व-चिंतनाचा अभाव: आपल्या वागण्याचा परिणाम इतरांवर काय होतो हे समजत नाही.

**स्वयंनियंत्रणाचा अभाव:** चटकन राग येतो, चुका मान्य करायला कंटाळा.

सहानुभूतीचा अभाव: इतरांची भूमिका समजून घ्यायची इच्छाच नसते. सामाजिक कौशल्यांचा अभाव: केवळ व्यवहारापुरते नाते ठेवले जाते.

**समाधानाची दिशा व्यक्तिगत स्तरावर:**

दररोज आत्मपरीक्षण करा, मी आज कोणाला ऐकले का? विनम्रतेने शिकण्याची वृत्ती ठेवा. समाजसेवा, स्वयंसेवी कार्य करा अहंकार कमी करण्यासाठी.

**कुटुंबात:** नम्रता आणि आदर या मूल्यांचं संगोपन करा. मुलांना सर्व स्तरांतील लोकांशी आदराने वागायला शिकवा.

**कामाच्या ठिकाणी :** सहकार्य, संवाद आणि एट यावर भर देणारी नेतृत्वशैली तयार करा. फक्त तांत्रिक कौशल्य नव्हे, तर माणूसपण मोजण्याचे निकष ठरवा.

**राष्ट्रीय स्तरावर:** शालेय शिक्षणात मूल्याधारित शिक्षणाचा समावेश. नम्रतेने मोठे झालेले सार्वजनिक व्यक्तिमत्वं समोर ठेवा. शेवटी सांगायचं तात्पर्य की प्रगतीचे खरे मोजमाप हे फक्त मोबाईल, गाडी, किंवा पगार याने होत नाही. ते आपल्या स्वभावाने, विचाराने, आणि दुसऱ्यांशी कसे वागतो याने होते. मोठा माणूस होण्यासाठी मोठा अहंकार नाही, मोठं मन लागतो. आपण जितके अहंकारात लहान होत जातो, तितकं समाज म्हणून आपलं उंची कमी होत जाते आणि ही इमारत, भले कितीही उंच बांधली गेली असली तरी त्याचा पायापासून उध्वस्त होण्याचा धोका संभवतो. हे टाळणे प्रत्येकाच्या हातात आहे आणि तेच अत्यंत गरजेचे देखील आहे.

**-प्रा. सु. ग. जाधव**
नांदेड
मो. ९४२३१४०७४१

---

# कर्म कर...

नको माझ्या मना । गुंतू मायाजाळी ।
उठून सकाळी । कर्म कर ।।
सत्याच्या पाठीशी । उभा विठुराया ।
विठू थोडी काया । बघणार ।।
सत्कर्म म्हणजे । खरी तुझी भक्ती ।
घालू नको शक्ती । वाया तुझी ।।
ठेवू नको घाण । तुझ्या हृदयात ।
तुच तुझा घात । करू नको ।।
आनंदी आनंद । नाम भजनात ।
हरिनाम गात । जग जरा ।।
निंदा,घृणा सोड । स्वीकार स्नेहाला ।
तुझ्या कर्तव्याला । भुलू नको ।।
सत्य कर्म धर्म । जात माणुसकी ।
कोणाची लायकी । काढू नको ।।
अजू म्हणे न्याय । मिळेल कर्माला ।
फक्त अधर्माला । शिवू नको ।।

**-अजय रमेश चव्हाण**
तरनोळी
ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

## थोडक्यात...

### पत्रकार संरक्षण समितीच्या जिल्हाध्यक्षपदी महेंद्र गायकवाड

**नांदेड (प्रतिनिधी)–** पत्रकार संरक्षण समितीच्या नांदेड जिल्हाध्यक्षपदी महेंद्र गायकवाड यांची फेरनिवड करण्यात आली आहे.



ही निवड सेवाग्राम वर्धा येथे झालेल्या पत्रकार संरक्षण समितीच्या राज्यस्तरीय संमेलनात करण्यात आली. सदरील नियुक्तीचे पत्र संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे व राज्य उपाध्यक्ष राम खुर्दळ यांच्या हस्ते गायकवाड यांना देण्यात आले.

पत्रकार संरक्षण समिती ही संपूर्ण महाराष्ट्रात शहरी व ग्रामीण भागातील पत्रकारांच्या न्याय, हक्कासाठी लढणारी नोंदणीकृत संघटना असून या संघटनेचे राज्यस्तरीय संमेलन सेवाग्राम वर्धा येथे पार पडले. या संमेलनात पत्रकार महेंद्र गायकवाड यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांची जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

### पोलीस असल्याची बतावणी करून फसवणूक

**नांदेड (प्रतिनिधी)–** आम्ही पोलीस आहोत अशी बतावणी करून पती-पत्नीकडून १ लाख ३० हजार रुपयांचे सोन्याचे दागिणे काढून घेवून फसवणूक केली. फसवणूक करणारे तालीम हुसेन इराणी (वय ४२) आणि समीर हुसेन (वय ३२) दोघे रा. परळी वैजनाथ यांना पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. भीमराव नरवाडे यांच्या फिर्यादीवरून मनाठा पोलीस ठाण्यात वरील दोघांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलीस हवालदार दाढे करत आहेत.





**मुखेड :** मुखेड-नरसी महामार्गावरील अतिक्रमणे काढण्यात येत असून तहसीलदार तथा मुख्याधिकारी राजेश जाधव यांनी ही कारवाई केली. यावेळी पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे यांच्यासह मोठा पोलीस ताफा व नगर परिषदेचे कर्मचारी उपस्थित होते. (छाया : गणेश आंबेकर)

# नवनिर्मिती कौशल्याची परंपरा आपल्या प्राचीन इतिहासात दडलेली –डॉ.प्रकाश निहलानी

**नांदेड (प्रतिनिधी)–** आपल्या सर्जनशीलतेला, नवनिर्मितीला आणि नाविन्यपूर्ण कौशल्येला कुठेही शोधायची गरज नाही, आपल्या प्राचीन इतिहासातच ही सर्व मूल्य प्रेरणा दडलेली आहे, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध कवी डॉ.प्रकाश निहलानी यांनी केले.



श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचालित इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नविन नांदेड येथे मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेच्या व आयोजित पदवी प्रथम वर्षाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थी प्रेरणा उपक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे, मराठी विभाग प्रमुख डॉ. शंकर विभुते, हिंदी विभाग प्रमुख डॉ लक्ष्मण काळे, डॉ.हनुमंत भोपाळे, डॉ.औरादकर, डॉ. छाया कदम, डॉ.मंजुषा कोल्हे, प्रा.वेणुताई नाईक, प्रा.पाटील उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ.निहलानी म्हणाले की, आपल्या प्राचीन प्रतिभेची उत्तुंग भरारी सिंधू संस्कृतीत दडलेले आहे.हडप्पा, मोहोजोदोडो हे आदर्श उदाहरणे जगासमोर आहेत. मनुष्य हा एकमेव प्राणी आहे की, त्यास प्रेरणा दिली तर तो काहीही करू शकतो. विद्यार्थ्यांनी आपल्यातील प्रतिभेचा शोध घ्यावा, आपली चिकाटी, मेहनत असेल तर तुमचं करियर तुमच्यापुढे लोटांगण घालेल असे आवाहन करून त्यांनी अनेक कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुर्गेश रवंदे म्हणाले की, दृढनिश्चय असल्याशिवाय तुम्हाला आज उभा राहता येणार नाही. आज नाविन्यपूर्ण कौशल्येला महत्त्व आहे. निर्णय घेण्यासाठी गोंधळात पडण्यापेक्षा चुकीचे निर्णय घेऊन यशस्वी झालेले खूप लोक आहेत. विद्यार्थ्यी फक्त अध्ययनार्थी न होता ज्ञानार्थी व्हावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना साहित्यिक डॉ. शंकर विभुते यांनी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेच्यावतीने आयोजित विविध उपक्रमांची माहिती सभागृहात दिली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय हिंदी विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मण काळे यांनी करून दिली. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भीतीपत्रकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.ए. मराठीचा विद्यार्थी अनिल लोंढे, नितीश कदम यांनी केले. या उपक्रमात डॉ.राजकुमार पवळे, डॉ.मिलिंदकुमार लोखंडे, डॉ. गंगाधर भोपाळकर, डॉ.अडकिणे, डॉ.आढाव, प्रा. काकडे व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# किनवट तहसील कार्यालयात शांतता समितीची बैठक



**किनवट (प्रतिनिधी)–** आगामी सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर येथील पोलीस ठाण्याच्यावतीने गुरुवारी तहसील कार्यालयाच्या सभागृहात शांतता समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर होत्या.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्यासह विविध कार्यालय प्रमुखांची उपस्थिती होती. बैठकीत गणेश मंडळांच्या पदाधिकारी व शांतता समितीच्या सदस्यांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील रस्त्यांसह राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करा, शहरातील विविध भागात बंद असलेले पथदिवे सुरू करा, पैनगंगा नदी पूर्ण क्षमतेने भरली असल्याने श्री विसर्जनासाठी विसर्जन घाटावर क्रेन व पुरेशा दिवाबत्तीची सोय करा, गणेशोत्सव काळात वीजपुरवठा अखंडित ठेवा, मोकाट गाढवं, खेचरांसह कुत्र्यांचा बंदोबस्त करा, अशी मागणी केली.

यावेळी शहरातील गणेश मंडळाचे पदाधिकारी, विविध पक्ष व संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. तालुक्याची शांततेची परंपरा कायम राखण्यासाठी आगामी सर्वच सण, उत्सव शांततेत व परंपरागत पद्धतीने साजरे करा, असे आवाहन तहसीलदार डॉ. शारद चोंडेकर यांनी याप्रसंगी केले.

# साधकांनी सर केले महाराष्ट्राचे सर्वोच्च शिखर कळसुबाई

## आर्ट ऑफ लिव्हिंग नांदेड परिवाराची पावसाळी सहल

**नांदेड (प्रतिनिधी)–** आर्ट ऑफ लिव्हिंग नांदेड परिवारातर्फे नगर जिल्ह्यातील कळसुबाई शिखरावर पावसाळी सहल आयोजित करण्यात आली होती. महाराष्ट्राचे एवरेस्ट मानले जाणारे हे शिखर साधकांनी उत्साह, आनंद आणि साधनेच्या उर्जेने सर केले.

या मोहिमेत लहानांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्व वयोगटातील साधक सहभागी झाले. काही तासांच्या ट्रेकमध्ये साधकांनी पहिल्याच प्रयत्नात शिखर सहज गाठले. नियमित योग, प्राणायाम व सुदर्शन क्रिया यांचा सराव हा या यशामागचा खरा आधार असल्याचे सर्वांनी अनुभवले.

यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक शिवा बिरकले, सुनीता पुजारी, सायली मेनन व स्वयंसेवकांच्या मार्गदर्शनाखाली ही सहल पार पडली. शिखरावर त्यांनी सुदर्शन क्रिया, योग व प्राणायाम



नियमित केल्यास शरीर सशक्त, मन प्रसन्न आणि जीवन आनंदी होते. यामुळे कोणतेही आव्हान आपण सहज जिंकू शकतो, असा संदेश त्यांनी दिला.

या सहलीमध्ये पावसाळ्यातील निसर्गाचे अप्रतिम सौंदर्य, पर्वतरांगांमध्ये साधकांचा जल्लोष, साधनेने दिलेली शारीरिक व मानसिक उर्जा, आयुष्यभर लक्षात राहील असा आध्यात्मिक अनुभव घेता आला असल्याचे यावेळी सांगण्यात आले. ही सहल केवळ शिखर सर करण्यापुरती मर्यादित नव्हती, तर साधकांच्या जीवनात उत्साह, सकारात्मकता आणि अंतरिक उर्जा जागवणारा आध्यात्मिक पर्वणीचा सोहळा ठरली.

# सिडको मोंढा मार्केट विकासासाठी कटिबद्ध –आ. बोंढारकर



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांवामनपाचा सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या सिडको-मोंढा मार्केट विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगून अष्टविनायक मंदिराच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्नशिल असल्याचे प्रतिपादन नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे आ. आनंदराव पाटील बोढारकर यांनी केले.

श्री अष्टविनायक गणपती मंदिर संस्थान, श्री गणेश नगर, मोंढा मार्केट, लातूर फाटा, सिडको येथे मुर्ती स्थापना करण्यात आली. यावेळी नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोढारंकर पाटील, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, नांदेड शहर प्रमुख तुलजेश यादव, सिडको शहर प्रमुख सुहास पाटील खराणे, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हा महानगर अध्यक्ष विनोद कांचनगिरे, संतोष कांचनगिरे, माजी नगरसेविका डॉ.ललिता शिंदे, पत्रकार रमेश ठाकूर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. रमेश नांदेडकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री अष्टविनायक गणपती मंदिर संस्थान, सर्व पदाधिकारी, सदस्य व रहिवाशी यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषदेककडून डिजिटल मित्र पोर्टल

**नांदेड (प्रतिनिधी)–** नागरिकांना पारदर्शक, सुलभ आणि जलद सेवा उपलब्ध करून देण्यासाठी नांदेड जिल्हा परिषदेने डिजिटल मित्र पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलच्या माध्यमातून कृषी, पशुसंवर्धन, घरकुल, समाजकल्याण, आरोग्य, शिक्षण, महिला व बालकल्याण यांसह विविध विभागांच्या योजना आणि सेवा नागरिकांना एका क्लिकवर मिळणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिली आहे.

ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना घरी बसून शासकीय सेवा मिळण्याचा मार्ग खुला झाला असून यामुळे वेळेची बचत, पारदर्शकता आणि शासनावरील नागरिकांचा विश्वास वाढणार आहे. योजनांबाबत माहिती व्हिडिओ क्लिपच्या स्वरूपात पाहता येणार आहेत. या पोर्टलवर लाभार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरता येणार असून तक्रारी, मागण्या व निवेदन सादर करण्याची सोयही या पोर्टलवर उपलब्ध आहे. अर्जाची सद्यस्थिती ४८ तासांत ऑनलाईन तपासता येईल.

शेतकऱ्यांसाठी ड्रोनसंबंधी अर्ज व माहिती, तसेच प्रशासन विभागातील ज्येष्ठता यादी व जीपीएफ यांसारख्या सेवा देखील या पोर्टलवर उपलब्ध असतील, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिली.

# पूरग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची काँग्रेसची मागणी



**किनवट (प्रतिनिधी)–** पैनगंगा नदीला आलेल्या पुरामुळे आणि तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि सर्व पूरपीडितांना शासनाने तत्काळ आर्थिक नुकसान भरपाई व मदत जाहीर करावी, अशी मागणी किनवट तालुका काँग्रेस पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात शासनाला पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, किनवट तालुक्यात दि.१४ ते १८ ऑगस्टपर्यंत अतिवृष्टी झाली. पैनगंगेला महापूर आल्यामुळे शहराच्या गंगानगर, नालागड्डा, मामीडगुडा, सुभाषनगर आदी सखल भागांतील घरांत पुराचे पाणी शिरले. यामुळे लोकांच्या घरांतील अन्नधान्यांसह जीवनावश्यक वस्तुंचे मोठे नुकसान झाले. अतिवृष्टीमुळे पिकांसह फळबागांचेही मोठे नुकसान झाले. या नुकसानीची तीव्रता लक्षांत घेवून शासनाने सर्व नुकसानग्रस्तांना तातडीने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी काँग्रेसने केली आहे.

यावेळी पक्षाचे तालुकाध्यक्ष के.सूर्यकांत रेड्डी, शहराध्यक्ष गिरीश नेम्मानीवार, के.मूर्ती, सिराज जीवाणी, सुभाष बाभूळकर, अंबादास पाटील, शेख इम्रान चांदसाब, अभय महाजन, लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, सुभाष बाबू नायक, अब्दुल खालिद नाकामुंशी, जवाद आलम, वसंत राठोड, संदीप निखाते, शेख शादुल्ला, शेख परवीन, फारूक बाबा, शरद कोत्तापेल्लीवार, अनिल बंगाळे, मुजाहिद शेख, माधव खेडकर आदी उपस्थित होते.

# मिलिंद विद्यार्थी वसतीगृहात विद्यार्थ्याच्या मृत्यूप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मिलिंद विद्यार्थी वसतीगृहातील विद्यार्थी मृत्यूप्रकरणी वसतीगृहातील मदतनीस आणि वसतीगृह अधीक्षक या दोघांविरुद्ध मृत्यूस कारणीभुत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नायगाव तालुक्यातील कुंचेली येथील ज्ञानेश्वर आत्माराम वडगावे (वय २९) यांचे पाल्य तुळशीराम ज्ञानेश्वर वडगावे (वय ११) हा मिलिंद विद्यार्थी वसतीगृह तरोडा नाका नांदेड येथे राहत होता. दि.१९ ऑगस्ट रोजी त्याला ताप व जुलाब सुरू झाला. वसतीगृह प्रशासनाने वेळीच त्याला रुग्णालयात दाखल केले नाही. उशिरा रुग्णालयात दाखल केल्यानंतर तुळशीराम या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. वसतीगृहातील मदतनिस राहुल शिवाजी सोनटक्के आणि वस्तीगृह अधीक्षक सुरज ढवळे यांनी संगणमत करुन उपचार देण्यासाठी हलगर्जीपणा केला असल्यामुळेच मुलाचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी भाग्यनगर पोलिसांनी ज्ञानेश्वर वडगावे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस उपनिरिक्षक सवराते करत आहेत.

# पोळा सण उत्साहात साजरा

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** बैल पोळा सण सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या ३९ गावांत शेतकरी राजाने जल्लोषात ढोलताशांच्या गजरात पोळा सण साजरा केला. यावेळी गावातील हनुमान मंदिरात प्रदक्षिणा मारून तर अनेक गावांत सामुदायिक मंगलाष्टके म्हणून सामुदायिक लग्न सोहळा, आरती करण्यात आली. यावेळी गावातील ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, प्रतिष्ठित नागरीक, पोलीस पाटील, तंटामुक्त अध्यक्ष यांच्यासह महिला, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी ग्रामीण पोलीस स्टेशनच्यावतीने पोलीस कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बैलपोळा सणाच्या निमित्ताने दि. २२ ऑगस्ट रोजी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतअसलेल्या तुप्पा, जवाहरनगर, भायेगाव, वाजेगाव, काकांडी, नागापूर, राहेगाव, वांगी, पुणेगाव, वाडीपुयड, वसरणी, असरजन, वाघाळा, असदवन, पिंपळगाव यासह जवळपास ३९ गावांत विधीवत पूजन करून सामुदायिक लग्न सोहळा, महाआरतीने बैलपोळा सण उत्साहात साजरा करण्यात आला.



नांदेड तालुक्यातील सामाजिक व शैक्षणिक चळवळीत अग्रेसर असलेल्या बाभुळगाव येथे सामुदायिक लग्न सोहळा सायंकाळी पाच वाजता संपन्न झाला. यावेळी महाआरतीनंतर मानकरी मारोती मस्के यांच्या हस्ते तोरण तोडण्यात आले. प्रारंभी गावातील शेतकरी बांधवांनी आपल्या सर्जा राजाची सजावट करून गावातील हनुमान मंदिरात येथे आणून प्रदक्षिणा घालून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथे सामुदायिक लग्न सोहळा संपन्न झाला. गावातील महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सरपंच पुंडलिक मस्के, तंटामुक्त अध्यक्ष सूर्यभान पाटील मोरे, प्रभाकर पाटील मोरे, अशोक मोरे, काळेशार मस्के, बालाजी पाटील मस्के, सूर्यभान मोरे, पोलीस पाटील संतोष मोरे, मधुकर मस्के, ग्रामपंचायत सदस्य, गावातील प्रतिष्ठित नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भायेगाव येथेही उत्साहात बैलपोळा सण साजरा करण्यात आला. यावेळी तोरण तोडण्याचा मान शामराव पाटील खोसडे मुकदम यांच्यासह गावातील २० शेतकरी बांधवांचा बैलजोडी हनुमान मंदिर येथे विधीवत पूजन करून पशुधन असलेल्या मालकांनी आपल्या निवासस्थानाबाहेर लग्न लावणु विधीवत पूजन केले. यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच प्रतिनिधी बालाजी पाटील भायेगावकर, अशोक पाटील कोचार, उपसरपंच बालाजी कोल्हे, विठ्ठल पाटील खोसडे, पोलीस पाटील सुमन खोसडे यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जवाहरनगर तुप्पा येथील हनुमान मंदिर येथे सायंकाळी ६ वाजता मानकरी वामन कदम यांच्या हस्ते तोरण तोडण्यात आले. यावेळी बबनराव कदम, दत्ता पाटील कदम यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिला, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सामुदायिक लग्न सोहळा, आरतीनंतर ढोलताशांच्या गजरात पशुधन मालकांनी गावातून मिरवणूक काढून निवासस्थानी विधीवत पूजन केले. राहेगाव येथे बैलपोळा सणानिमित्त गावातील हनुमान मंदिर येथे उत्साहात पशुधन मालकांनी ढोलताशांच्या गजरात विधीवत पूजन केले. यावेळी रामदास इंगळे, आनंदा पाटील भोंग, पोलीस पाटील प्रतिनिधी संजय इंगळे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री शिवानंद शिवाचार्य महाराज यांचे पोर्णिमानगर येथे प्रवचन

**नांदेड (प्रतिनिधी)–** श्री ष. श्री. १०८ श्री शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूर कपिलेश्वर तीर्थक्षेत्र यांचे संगीत रूद्र पुजा व प्रवचन इंदिरा सार्वजनिक वाचनालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आले आहे. श्री बसवलिंग संगीत रूद्र मंडळ यांच्या सहकार्याने संयोजक बी.जी. देशमुख व सौ.ज्योती बालाजीराव देशमुख यांनी शिवानंद शिवाचार्य महाराज यांचे प्रवचन सोमवार, दि.२५ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते २ या वेळेत आयोजित केले आहे.

याप्रसंगी आ.हेमंत पाटील, आ.बालाजी कल्याणकर, आ.आनंद बोंढारकर, पीआय संदीप भारती, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुस्से, ग्रंथालय राज्य तपासणी अधिकारी प्रताप सुर्यवंशी, नांदेड जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सुर्यवंशी, माजी जि.प.अध्यक्ष संभाजी धुळगंडे, माजी जि.प.सदस्य शिवाजीराव कदम आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती संयोजक शिवसेना राज्य ग्रंथालय सेलचे अध्यक्ष बी. जी. देशमुख यांनी दिली. प्रवचनाचा कार्यक्रम संपल्यानंतर महाआरती, प्रसाद, भक्तांना आशिर्वाद व दर्शनाचा वेळ ठेवण्यात आला आहे. यावेळी मान्यवरांच्या सन्मानाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन बी.जी. देशमुख, ज्योती देशमुख, शंकर खंदारे, तमलूरकर यांनी केले आहे.

# चंदेरी

# नक्षलवादी म्हणून नाहीतर मी काळा म्हणून चित्रपटातून काढून टाकायचे...

## विशेष मुलाखत : अभिनेता मिथून चक्रवर्तींनी स्पष्टवक्तेपणाबद्दल सांगितले...



**पाच दशकांची कारकीर्द, चार राष्ट्रीय पुरस्कार, दादासाहेब फाळके पुरस्कार विजेते, प्रसिद्ध कलाकार मिथुन चक्रवर्ती जितके स्पष्टवक्ते आणि बिनधास्त स्वभावाचे आहेत. आजकाल ते द बंगाल फाइल्स या वादग्रस्त चित्रपटामुळे चर्चेत आहेत. यानिमित्ताने घेतलेल्या विशेष मुलाखतीत चित्रपट, वादग्रस्त विधाने, संघर्ष, काळ्या रंगामुळे होणारा भेदभाव, नक्षलवादी असल्याचा भूतकाळ अशा मुद्द्यांवर त्यांनी त्यांच्याच शैलीत मोकळेपणाने उत्तरे दिली...**

▪ प्रश्न : तुमच्या पन्नास वर्षांच्या कारकिर्दीत तुम्ही सतत चित्रपटसृष्टीला वेळोवेळी तारले आहे. आज मागे वळून पाहताना तुम्हाला कसे वाटते?

» मिथून : एक काळ होता जेव्हा मी एक स्ट्रगलर होतो. नंतर सुपरस्टार झालो. इतके पुरस्कार आणि नंतर दादासाहेब फाळके पुरस्कार, पण मी स्वतःला सुरुवातीचाच मिथुन चक्रवर्ती मानतो. सुरुवातीच्या मिथुन आणि आजच्या मिथुनमध्ये काहीही फरक नाही. मी कोणाचा मिथुन दादा आहे, कोणाचा मित्र आहे, कोणाचा शेजारी आहे. मी नेहमीच ती भावना जपली आहे. मी कधीही माझ्या मनात असा विचार येऊ दिला नाही की मला चार राष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.

▪ प्रश्न : तुम्हाला चार राष्ट्रीय पुरस्कार आणि दादासाहेब फाळके पुरस्कार मिळाले आहेत, मग तुम्ही द बंगाल फाइल्ससारख्या चित्रपटासाठी का होकार दिला?

» मिथून : कारण विवेक अग्निहोत्री चित्रपट बनवतात तेव्हा माझ्यासाठी एक पात्र तयार करतात. मी हा चित्रपट त्या पात्रामुळे निवडला. मी एका वेड्या माणसाची भूमिका साकारत आहे, जो प्रत्यक्षात वेडा नाही. एक पोलीस अधिकारी ज्याची जीभ सत्य बोलण्यासाठी कापली गेली. तो रस्त्यावर कुठेही झोपतो, कचऱ्याच्या डब्यातून अन्न खातो. तो बोलू शकत नाही, तो अडखळतो. मला हे पात्र साकारताना खूप त्रास झाला, पण विवेकला मी ते करावे असे वाटत होते. बराच काळ मी ते करण्यास नकार देत राहिलो, पण शेवटी मी ते केले.

▪ प्रश्न : चित्रपटाचे दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांनीही मान्य केले की हा एक अजेंडा असलेला चित्रपट आहे, तुमचे काय म्हणणे आहे?

» मिथून : नक्कीच, हा एक अजेंडा असलेला चित्रपट आहे. विवेक सत्यावर चित्रपट बनवतो, कोणत्याही बनावट कथेवर नाही. त्याचे दस्तऐवजीकरण अद्भुत आहे, संशोधन खोल आहे. तो चित्रपट बनवेल आणि पुराव्यांसह तुम्हाला दाखवेल. म्हणून त्याने यात काहीही चुकीचे म्हटले नाही.

▪ प्रश्न : अलीकडेच शेजारच्या देशाबद्दलच्याकेलेल्या विधानामुळे तुम्ही वादात सापडला आहात? (सिंधू पाणी करार या मुद्द्यावरून पाकिस्तानने भारताला धमकी दिल्यावर मिथुन चक्रवर्ती यांनी ही टीका केली होती, की आम्ही एक धरण बांधण्याचा विचार करत आहोत, जिथे १४० कोटी लोकं एकत्र लघवी करतील. त्यानंतर आम्ही ते धरण उघडलं, तर त्सुनामी येईल.)

» मिथून : मी जे काही बोलतो, ते सत्य बोलतो. माझ्या मनात जे येते ते मी बोलतो, मग ते शेजारच्या देशासाठी असो किंवा इतर कोणत्याही देशासाठी. मी हार मानायला शिकलो नाही. तुम्हाला माहित असेलच की, बॉक्सिंगमध्ये दहापर्यंतची संख्या असते आणि मी नऊच्या संख्येलाच उभा राहायचो. नंतर ज्याला मी मारले तो उठला नाही...

▪ प्रश्न : तुमच्या संघर्षाच्या दुःखद कथा खूप प्रसिद्ध आहेत, लोक त्यातून प्रेरणा घेत आहेत.

» मिथून : हो, पण जर मी माझ्या संघर्षाची खरी कहाणी सांगू लागलो तर प्रेरणा घेणाऱ्या लोकांचे धाडस तुटेल. ते म्हणतील की आपण इतका त्रास सहन करू शकत नाही. माझ्यासाठी, प्रत्येक दिवस संघर्ष होता. जर मी माझ्या संघर्षाच्या दिवसांबद्दल बोललो तर गावागावांतून आणि शहरातून अभिनेता बनण्यासाठी येणारे लोक ते ऐकून आशा गमावतील. म्हणूनच मी त्याबद्दल जास्त बोलत नाही आणि त्यावर बायोपिक बनवू देत नाही, मला माहित आहे की लोक ते सहन करू शकणार नाहीत.

▪ प्रश्न : संघर्षाच्या काळात, बुडणाऱ्या व्यक्तीसाठी एक आशेचा किरणही पुरेसा असतो? तुमच्यासाठी तो आशेचा किरण कोणता होता?

» मिथून : मला मिळालेला पहिला चित्रपट, ज्यामध्ये मी आदिवासी नायकाची भूमिका केली होती, ती भूमिका माझ्यासाठी परफेक्ट होती. तो चित्रपट होता मृगया, ज्यासाठी मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. त्यानंतर मी रक्षक, सुरक्षा या चित्रपटांमध्ये काम केले. मी अभिनयाच्या दृष्टिकोनातून, नृत्याच्या दृष्टिकोनातून विकसित झालो. मी लोकांना सांगायचो, माझा रंग पाहू नका, माझा नृत्य पहा. तुम्हाला लक्षात आले असेल की माझे सर्व नृत्य माझ्या पायांनी केले जाते. मी माझ्या चेहऱ्यावर जास्त लक्ष केंद्रित करत नाही. मी एल्विस प्रेस्लीचा चाहता आहे, म्हणून मी त्याच्या डान्स स्टेप्स कॉपी केल्या आणि माझी स्वतःची स्टाईल तयार केली, जी आज मिथुन चक्रवर्तीची डान्सिंग स्टाईल आहे जी प्रत्येक पार्टी किंवा कार्यक्रमात कॉपी केली जाते.

▪ प्रश्न : तुम्ही नक्षलवादाशी देखील जोडलेले होतात, त्यामुळे तुम्हाला इंडस्ट्रीकडून स्वीकारण्यात काही अडचण आली का?

» मिथून : नाही, नाही, त्यांना नंतर कळले की मी नक्षलवादी आहे. आता मी त्याबद्दल बोलू इच्छित नाही. पण माझ्या



रंगामुळे मला सर्वात जास्त त्रास झाला आणि तोच रंग नंतर एक सेक्सी-डस्की बंगाली बाबू बनला. पण माझ्या रंगामुळे, अनेकदा कास्ट झाल्यानंतरही मला चित्रपटातून बाहेर काढण्यात आले होते. हे कधीच संपणार नाही.


▪ प्रश्न : ७०-८० च्या दशकात तुम्ही मुंबईत आलात तेव्हा तुमचे अनुभव काय होते?

» मिथून : (हसत) मी पहिल्यांदा इथे आलो तेव्हा टॅक्सी ड्रायव्हरने मला मूर्ख बनवले. माटुंगा पोहोचण्यासाठी दोन मिनिटांचा प्रवास होता, पण तो मला जुहूमधून घेऊन गेला. मी पोलिसाला विचारले की माटुंगा कुठे आहे. तो म्हणाला, तू इथे काय करतोयस? हे जुहू आहे. टॅक्सी ड्रायव्हर माझ्याकडून पैसे उकळत होता. असो, ते दिवस होते. त्यानंतरही संघर्षाने मला सोडले नाही. मी बरेच दिवस उपाशी राहिलो. मी फूटपाथवर झोपलो देखील.

# हो, मी एका अजेंड्यावर चित्रपट बनवतो...

## ‘द बंगाल फाइल्स’चे दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांचे स्पष्ट शब्द

**चित्रपट दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री द बंगाल फाइल्स या चित्रपटामुळे सध्या वादात सापडले आहेत. या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित होताच गोंधळ उडाला. लॉंचिंग इव्हेंटच्या दिवशी काही लोकांनी कोलकात्याच्या एका हॉटेलमध्ये गोंधळ घातला. त्यानंतर दिग्दर्शकाविरुद्ध एफआयआरदेखील नोंदवण्यात आला. अलिकडेच विवेक अग्निहोत्री, अभिनेत्री पल्लवी जोशी आणि निर्माता अभिषेक अग्रवाल दिल्लीला आले तेव्हा त्यांनी या वादावर माध्यमांशी उघडपणे संवाद साधला...**



अलीकडेच, कोलकाता प्रशासनाने द बंगाल फाइल्सच्या ट्रेलर लॉंचवर बंदी घातली. हा चित्रपट १९४६ च्या कोलकाता दंगलींवर आधारित आहे. चित्रपट दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री यांच्या मते, ट्रेलरला सेन्सॉर बोर्डाकडून हिरवा कंदील मिळाला असतानाही स्थानिक प्रशासनाने त्यांना ट्रेलर लॉंच का थांबवत आहेत हे सांगितले नाही.

### मी एक चित्रपट निर्माता आहे, पंतप्रधान नाही...

द काश्मीर फाइल्स, द बंगाल फाइल्स बनवले आहेत. तर येत्या काळात ते गुजरात, मुझफ्फरनगर आणि मेरठ दंगलींवरही चित्रपट बनवतील का? या प्रश्नाच्या उत्तरात विवेक यांनी कडवट स्वरात म्हटले, की यावर चित्रपट बनवण्याची अपेक्षा करणाऱ्यांचा मी आभारी आहे. मी एक चित्रपट निर्माता आहे, देशाचा पंतप्रधान नाही. संपूर्ण चित्रपट उद्योगात २०० ते ३०० चित्रपट दिग्दर्शक आहेत आणि तुम्हाला असे वाटले की संपूर्ण भारतात होणाऱ्या दंगलींवर चित्रपट बनवण्यासाठी मी एकमेव सक्षम आहे. तथापि, त्यांनी या विषयांवर चित्रपट बनवणार की नाही हे स्पष्ट केले नाही.

### मी हिंदू संस्कृतीवर चित्रपट बनवतो...

विवेक अग्निहोत्री विशिष्ट उद्देशाने चित्रपट बनवतात का? दिग्दर्शक म्हणाले, की हो, हा माझा उद्देश आहे आणि मी उघडपणे म्हणतो की माझा एक अजेंडा आहे आणि मी हे कधीही लपवलेले नाही. एक चित्रपट निर्माता म्हणून, मी भारताच्या कथा सांगतो ज्यामध्ये सत्य दाबले गेले होते, जसे आम्ही ताश्कंद फाइल्स किंवा काश्मीर फाइल्समध्ये लोकांना सांगितले होते. आम्ही दोन्ही चित्रपटांमध्ये काय बरोबर आहे आणि काय चूक आहे हे सांगितले नाही. पण माझे ध्येय स्पष्ट आहे की मी हिंदू संस्कृतीवर चित्रपट बनवतो, म्हणून मी हिंदूंच्या इतिहासावर चित्रपट बनवतो. मी स्वतःला इस्लामिक किंवा ख्रिश्चन इतिहासावर चित्रपट बनवण्यास सक्षम मानत नाही. कारण अनेक लोकांनी त्यावर चित्रपट बनवले आहेत.

### *मराठी जेवणाबद्दलच्या वक्तव्याचा विपर्यास*

*मी दिल्लीचा असल्याने मला झणझणीत आणि मसालेदार जेवणाची सवय होती. लग्नानंतर पल्लवीनं मला वरण-भात खा, असं म्हटलं होतं. पण त्या वरणामध्ये मीठसुद्धा नसतं. तेव्हा मला सुरुवातीला वाटायचं की, हे काय गरिबांचं जेवण आहे... असे वक्तव्य काही दिवसांपूर्वी विवेक यांनी केल्याचं समोर आलं होतं. त्यावर बोलताना विवेक म्हणाले, की माझ्या वाक्याचा विपर्यास केला गेला. आमच्याकडे Curly Tales ची मुलगी पॉडकास्ट करण्यासाठी आली होती, तेव्हा गप्पा मारताना दिल्लीहून मुंबईला गेलो, तेव्हा पल्लवी जोशीने मला वरण-भात खायला दिलं आणि तेव्हा मी मजामस्करीत असं म्हटलं की, त्यांच्या जेवणात मीठही नसतं. हे काय गरीब लोकांचं जेवण आहे वगैरे वगैरे पण त्यानंतर मी हेही म्हटलं होतं की, अक्कल आल्यानंतर मला कळलं की, भारतात सगळ्यात जास्त आरोग्यदायी जेवण हे महाराष्ट्रीय जेवण आहे. वरणभात हे माझं आवडतं जेवण आहे आणि ते मी आता रोजच खातो. काही लोकांनी माझं सुरुवातीचं वाक्य एडिट केलं आणि मी महाराष्ट्रीय जेवणाला गरीब जेवण म्हटल्याबद्दल माझ्यावर टीका केली. काही लोक वाक्य एडिट करून चुकीच्या पद्धतीनं पसरवतात. मला आता कोणत्या वादात अडकायचं नाही, असे विवेक अग्निहोत्री म्हणाले. ‘द बंगाल फाइल्स’ चित्रपटात पल्लवी जोशी, मिथुन चक्रवर्ती, अनुपम खेर, दर्शन कुमार व सिम्रत कौरसारख्या कलाकारांच्या प्रमुख भूमिका आहेत.*

## सुनीता आहुजा अन् गोविंद खरंच होणार विभक्त?

गोविंदा आणि सुनीता आहुजाच्या घटस्फोटाच्या बातम्या पुन्हा एकदा चर्चेत आल्या आहेत. सुनीताने वांद्रे कुटुंब न्यायालयात गोविंदापासून घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला असून, याबद्दल गोविंदाच्या वकिलाने दिलेली माहिती महत्त्वपूर्ण ठरत आहे. अफवांवर प्रतिक्रिया देताना ते म्हणाले, की कोणताही खटला नाही. सर्व काही मिटवले जात आहे. लोक जुन्या गोष्टी पुन्हा समोर आणून अफवा पसरवत आहेत. लवकरच गणेश चतुर्थी येईल, तुम्ही सर्व एकत्र भेटाल. घरी या... एका वृत्तानुसार, सुनीताने घटस्फोटाच्या याचिकेत गोविंदावर व्यभिचार, क्रूरता आणि इतर महिलांशी संबंध असल्याचा आरोप केला आहे. ही याचिका डिसेंबर २०२४ मध्ये दाखल करण्यात आली होती. गोविंदाला २५ मे २०२५ रोजी कुटुंब न्यायालयाने समन्स बजावले होते, परंतु तो सुनावणीला हजर राहिला नाही. तथापि, सुनीता न्यायालयात प्रत्येक सुनावणीत हजर राहिली. गोविंदा आणि सुनीता यांच्याशी संबंधित एका जवळच्या सूत्राने सांगितले की, त्यांचे लग्न ३८ वर्षांपूर्वी झाले आहे. प्रत्येक जोडप्याप्रमाणे त्यांच्या आयुष्यातही चढ-उतार येतात. कोणत्या जोडप्यामध्ये मतभेद नाहीत? हो, ते भांडतात. मी स्वतः त्यांना भांडताना पाहिले आहे. पण ते कधीही कायमचे वेगळे होणार नाहीत. भांडणानंतर, गोविंदा त्याच्या दुसऱ्या बंगल्यात राहायला जातो आणि जेव्हा प्रकरण शांत होते तेव्हा तो परत येतो. एकूणच प्रकरणात सध्या नक्की काय सुरू आहे, हे कळायला मार्ग नाही. दोघे एकत्र येऊन यावर स्पष्टीकरणही देत नसल्याने चर्चा आणि अफवा पुन्हा पसरतच आहेत.


## बोमण इराणी शाहरुखला बोरिंग का म्हणाले...

**शाहरुख खान बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्यांपैकी एक आहे. त्याचा चाहतावर्ग खूप मोठा आहे. प्रेक्षकांचाच नाही तर तो अनेक कलाकारांचाही आवडता अभिनेता आहे. परंतु, असं असताना प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेते बोमन इराणी यांनी त्याला बोरिंग म्हणत त्याच्याबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला आहे...**

> **“मला खूप साधं जेवण आवडतं. मी दिवसातून फक्त दोन वेळा जेवतो. त्याव्यतिरिक्त मी काहीही खात नाही. मला फार वेगवेगळ्या पद्धतीचं जेवण आवडत नाही. मी कडधान्य खातो, चिकन खातो, भाज्या खातो; मी कित्येक वर्षे हेच खात आलो आहे.**
> **-शाहरुख खान**

‘हॅपी न्यू इयर’ या गाजलेल्या चित्रपटात शाहरुखसोबत बोमन इराणी यांनी काम केलेले आहे. ते म्हणाले, की शाहरुख खान सेटवर खूप आनंदी असतो. त्याला लोकांबरोबर राहायला आवडतं. मी त्याची वेगळी बाजू पाहिलेली आहे. जिथे तो खूप मस्ती करायचा. शाहरुख खान सेटवरील सहकलाकारांबरोबर गेम खेळतो. तो असला की सेटवर कायम आनंदी वातावरण असतं. शाहरुख खान सहकलाकारांना कधीच तो स्टार आहे, असं वाटू देत नाही. पण, त्याच्याबद्दल एक तक्रार आहे. तो खूप बोरिंग आहे. त्याला फक्त तंदुरी चिकन खायला आवडतं आणि तो दुसरं काहीही खात नाही. तो वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन वेगळ्या पदार्थांचा आस्वाद घेणारा व्यक्ती नाही. जेव्हा आम्ही कुठे एकत्र जातो, तेव्हा सगळे त्यांच्या आवडत्या पदार्थांवर ताव मारत असतात, पण शाहरुख मात्र असाच बसलेला असतो, त्यामुळे मला त्याच्याबद्दल ही तक्रार आहे.





## महाराजा : ‘दृश्यम’पेक्षा दमदार क्लायमॅक्स असलेला चित्रपट

**आजकाल सस्पेन्स, थ्रिलर व ॲक्शन चित्रपटांची ओटीटीवर क्रेझ पाहायला मिळतेय. प्रेक्षक दमदार कथानक असलेले चित्रपट ओटीटीवर पाहणं पसंत करतात. काही सिनेमांमध्ये तर इतके भयंकर ट्विस्ट असतात की पाहणारे भांबावून जातात. आज आम्ही तुम्हाला अशाच एका चित्रपटाबद्दल सांगणार आहोत, ज्याचा क्लायमॅक्स ‘दृश्यम’पेक्षाही दमदार आहे. या चित्रपटाचं नाव आहे महाराजा. दाक्षिणात्य स्टार विजय सेतुपती यात मुख्य भूमिकेत आहे. त्याच्या करिअरमधील हा ५० वा चित्रपट प्रचंड गाजला. महाराजाचं फक्त प्रेक्षकच नाही तर समीक्षकांकडूनही खूप कौतुक झालं. आयएमडीबीवर ८.४ रेटिंग असलेला हा २०२५ मध्ये सर्वाधिक कमाई करणाऱ्या दाक्षिणात्य सिनेमांपैकी एक होता.**



### काय आहे कथा

महाराजा चित्रपटाची कथा विजय सेतुपती साकारत असलेले पात्र व त्याच्या मुलीभोवती फिरते. एका दुर्घटनेत त्याच्या पत्नीचा मृत्यू होतो, पण कचरापेटीमुळे मुलीचा जीव वाचतो. नंतर तो त्या कचरापेटीचं नाव ‘लक्ष्मी’ ठेवतो. एकेदिवशी तो पोलीस स्थानकात जाऊन ‘लक्ष्मी’ बेपत्ता झाल्याची तक्रार देतो. तो नेमका एखाद्या व्यक्तीच्या बेपत्ता होण्याची तक्रार देतोय की एखादी वस्तू हरवल्याची याबद्दल सुरुवातीला गोंधळ होतो. त्यानंतर हळुहळू काही गोष्टींचा उलगडा अशा पद्धतीने होतो ज्याची कुणीच कल्पनाही केली नसते.

## ‘लक्ष्या’च्या लेकीचं व्यवसायात पदार्पण

मराठी मनोरंजन विश्वात अशा अनेक अभिनेत्री आहेत, ज्यांनी आपल्या अभिनयाने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. मात्र, अभिनयाबरोबरच व्यवसायातदेखील अनेक अभिनेत्रींनी आपलं नाव कमावलं आहे. तेजस्विनी पंडित, अभिज्ञा भावे, प्राजक्ता माळी, रेश्मा शिंदे, मृणाल दुसानीस या आणि अशा अनेक अभिनेत्रींनी स्वतःचा नवा व्यवसाय सुरू केला आहे. नुकतंच ऋतुजा बागवेनेही स्वतःचं रेस्टॉरंट सुरू करत व्यवसाय क्षेत्रात पदार्पण केलं. यात आता आणखी एका अभिनेत्रीची भर पडली आहे, ती म्हणजे स्वानंदी बेर्डे. दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बर्डे यांची लेक स्वानंदी बेर्डेने व्यवसाय क्षेत्रात पदार्पण केलं आहे. ही आनंदाची बातमी तिने आपल्या सोशल मीडियाद्वारे चाहत्यांना दिली आहे. स्वानंदीने स्वतःचा ज्वेलरी ब्रँड सुरू केला आहे. आई- वडिलांच्या नावावरून तिने तिच्या ज्वेलरी ब्रँडचं नाव ठेवलं आहे. स्वानंदीच्या ज्वेलरी ब्रँडचं नाव ‘कांतप्रिया’ असं आहे. वडील लक्ष्मीकांत यांच्या नावातील ‘कांत’ आणि आई प्रिया यांच्या नावामधील ‘प्रिया’ असं एकत्र करून तिने ‘कांतप्रिया’ हे नाव ठेवलं आहे. ‘कांतप्रिया’ या ब्रँडची खास झलक तिने आपल्या सोशल मीडियावर शेअर केली आहे.



# आमदारावर ईडीची छापेमारी; १२ कोटी रोख, ६ कोटींचे दागिने मिळाले



**नवीदिल्ली :** कर्नाटकातील काँग्रेस आमदार केसी वीरेंद्र यांना सिक्कीममधून अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) अटक केली. वीरेंद्र यांना मनी लाँडरिंग प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) अटक करण्यात आली आहे. त्यांच्यावर बेकायदेशीर ऑनलाइन आणि ऑफलाइन सट्टेबाजीचा आरोप आहे. शुक्रवारी ईडीने वीरेंद्र यांच्या लपण्याच्या ठिकाणांवर छापे टाकले. छापेमारीदरम्यान, तपास यंत्रणेला १२ कोटी रुपये रोख आणि ६ कोटी रुपयांचे सोन्याचे दागिने सापडले. एक कोटी रुपयांचे परकीय चलन देखील जप्त करण्यात आले. चार वाहने देखील जप्त करण्यात आली आहेत.

केसी वीरेंद्र हे कर्नाटकच्या चित्रदुर्ग विधानसभेचे आमदार आहेत. गोव्यातील कॅसिनो व्यवसायात आमदाराचा वाटा असल्याचे सांगितले जाते. प्रसिद्ध पपीज कॅसिनोसह सुमारे पाच कॅसिनो त्यांचे आहेत. दुसरीकडे, ८ दिवसांपूर्वी कर्नाटकातील दुसऱ्या काँग्रेस आमदाराच्या घरी १.४१ कोटी रुपये सापडले कर्नाटकात गेल्या ८ दिवसांत काँग्रेसचे दोन आमदार तपासाच्या कक्षेत आले आहेत. यापूर्वी १४ ऑगस्ट रोजी ईडीने कर्नाटकचे काँग्रेस आमदार सतीश कृष्ण साईल यांच्या घरातून १.४१ कोटी रुपये जप्त केले होते. ईडीने त्यांच्या आणि त्यांच्या कुटुंबाच्या बँक लॉकरमधून ६.७५ किलो सोन्याचे दागिने आणि बिस्किटे जप्त केली आहेत.

ईडीने सांगितले की, झडतीदरम्यान सापडलेल्या रोख आणि सोन्याव्यतिरिक्त, १४.१३ कोटी रुपयांच्या ठेवी अस-लेली बँक खाती देखील गोठवण्यात आली आहेत आणि अनेक महत्त्वाची कागदपत्रे, ईमेल आणि रेकॉर्ड देखील जप्त करण्यात आले आहेत. साईल हे उत्तर कन्नड जिल्ह्यातील कारवार विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. हा खटला २०१० मध्ये बेकायदेशीरपणे लोहखनिज निर्यातीशी संबंधित आहे. साईलवर बेलकेरी बंदरातील इतर कंपन्या आणि अधिकाऱ्यांशी संगनमत करून सुमारे १.२५ लाख मेट्रिक टन लोह परदेशात बेकायदेशीरपणे पाठवल्याचा आरोप आहे, ज्याची एकूण किंमत ८६.७८ कोटी रुपये असल्याचे सांगितले जाते.

# न्यूयॉर्कमध्ये ५४ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या टूर बसचा भीषण अपघात; ५ जणांचा मृत्यू, प्रवाशांमध्ये भारतीय पर्यटक



**नवीदिल्ली :** न्यूयॉर्कमधील आंतरराज्य महामार्गावर ५४ प्रवाशांना घेऊन जाणारी एक टूर बसचा भीषण अपघात झाला. या बसमध्ये ज्यामध्ये अनेक भारतीय होते, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या भीषण अपघातात पाच पर्यटकांचा मृत्यू झाला. न्यूयॉर्कमधील बफेलोच्या पूर्वेला सुमारे ४० किमी अंतरावर असलेल्या पेम्ब्रोक येथे इंटरस्टेट ९० च्या पूर्वेकडे हा अपघात झाला. राज्य पोलिस मेजर आंद्रे रे यांनी दिलेल्या माहितीनुसार चालकाचे लक्ष विचलित झाल्याने बसवरील नियंत्रण गमावले, ज्यामुळे बस उजव्या बाजूला उलटून अपघातग्रस्त झाली. यांत्रिक बिघाडाची शक्यता नाकारण्यात आली आहे. अपघातातून चालक बचावला आहे आणि तो तपासात सहकार्य करत आहे. बस न्यूयॉर्क शहरातील स्टेटन आयलंड येथील एम अँड वाय टूर इंक द्वारे चालवली जात होती.

**प्रवाशांमध्ये भारतीय पर्यटक**

बसमध्ये १ ते ७४ वर्षे वयोगटातील प्रवासी होते. घटनास्थळी पाच जणांचा मृत्यू झाला. अपघातादरम्यान बसमधून अनेक जण बाहेर काढण्यात आले. डझनभर प्रवाशांना रुग्णालयात नेण्यात आले, परंतु अधिकाऱ्यांनी सांगितले की कोणत्याही गंभीर दुखापती झाल्या नाहीत. बहुतेक प्रवासी भारतीय, चिनी आणि फिलिपिनो वंशाचे होते. आपत्कालीन प्रतिसादादरम्यान मदत करण्यासाठी अनुवादकांना बोलावण्यात आले. गंभीर जखमी प्रवाशांना हलविण्यासाठी मर्सी फ्लाइट मेडिकल ट्रान्सपोर्टने तीन हेलिकॉप्टर तैनात केली होती.

# राज्य महोत्सव गणेशोत्सवाकरिता प्रत्येक शासकीय विभागाने सहभागीता वाढविण्याचे आवाहन

**मुंबई**–गणेशोत्सव हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. गणेशोत्सवाला राज्य महोत्सव घोषित केले आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती गणेशोत्सवात सहभागी असते. आता 'गणेशोत्सव' प्रथमच राज्य शासन साजरा करत असल्याने हा उत्सव आता अधिक व्यापक प्रमाणात साजरा करून त्यात लोकसहभाग वाढवावा. यासाठी प्रत्येक विभागांनी विविध उपक्रमातून आपली सहभागीता वाढवून आपापल्या समाज माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करावी, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी उपस्थित सर्व राज्य आणि केंद्र सरकारी अधिकाऱ्यांना दिल्या.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड.शेलार यांच्या उपस्थितीत राज्य तसेच केंद्र शासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत एमएसआरडीसी महामंडळ, वांद्रे येथे बैठक झाली. या बैठकीस मुंबई महानगर पालिका आयुक्त भूषण गगराणी, माहिती व जनसंपर्क महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, पोलीस आयुक्त, मुंबई महानगर विकास प्राधिकरण, म्हाडा, मुंबई पोर्ट ट्रस्ट, मुंबई विद्यापीठ, सीमा शुल्क, बेस्ट, एमआयडीसी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, एचपीसीएल, बीपीसीएल, मध्य व पश्चिम रेल्वे, भारतीय जीवन विमा प्राधिकरण, राष्ट्रीय केमिकल्स ण्ड फर्टीलायझर लि., भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, अदानी एअरपोर्ट, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्ड, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य विकास पायाभूत सुविधा महामंडळ, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, महाजनको, इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, अदानी पॉवर, टाटा ट्रस्ट, टाटा पॉवर तसेच केंद्र व राज्य शासनाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री ड.शेलार म्हणाले की, गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता २२ देशांमध्ये साजरा होतो. सार्वजनिक तसेच घरगुती पद्धतीने आणि आता राज्य शासनामार्फतही साजरा होणारा हा गणेशोत्सव सर्व धर्म, जात, भाषांना जोडणारा उत्सव असावा. या गणेशोत्सव काळात तालुका ते राज्य स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धांसाठी १० कोटी रुपयांची बक्षिसे ठेवली जाणार असून समाजमाध्यमांवरून विशेष मोहीम राबवली जावी. गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक विभागाने नाट्य, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील वर्ल्ड युनोस्कोचा दर्जा मिळालेले छत्रपती शिवाजी महाराज यांचे गडकिल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विषय घेऊन कार्यक्रम राबविण्यात यावेत. घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सवाचे फोटो-व्हिडिओ जगभरातून अपलोड करता यावेत, यासाठी विशेष प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत असून यात प्रमुख मंडळांचे थेट प्रक्षेपण सुद्धा उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर चित्रपट महोत्सव, शैक्षणिक कार्यक्रम आदी विषयांवर निबंध, चित्रकला, ब्लॉग स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

गणेशोत्सवाच्या १० दिवसाच्या काळात आपापल्या विभागात विशेष उपक्रम, स्पर्धा, रोषणाई आदींसह विशेष उपक्रम अंतर्गत ऑपरेशन सिंदूरद्वारे माजी सैनिकांचा जिल्हानिहाय सत्कार करण्यात यावा. तसेच आत्मनिर्भर भारत व स्वदेशी संकल्पना यांचा गौरव करण्यात यावा, असेही निर्देश मंत्री ड.शेलार यांनी या बैठकीत दिले.

गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीत भर पडली आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार असल्याचे मंत्री ड.शेलार यांनी सांगितले.

## राज ठाकरेंना शिवीगाळ, मनसैनिक भडकले; परप्रांतीय तरुणाच्या वॉशिंग सेंटरची तोडफोड

**मुंबई:** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना दारुच्या नशेत शिवीगाळ करणाऱ्या परप्रांतीय व्यक्तीच्या वॉशिंग सेंटरची तोडफोड करण्यात आली आहे. सुजीत दुबे असं या परप्रांतीय तरुणाचं नाव आहे. अंधेरी पूर्वेला असलेल्या महाकाली रोडवर सुंदर नगर परिसरात दुबे वास्तव्यास आहे. याच भागात त्याचं वॉशिंग सेंटर आहे. त्याची तोडफोड मनसैनिकांनी केली आहे.

मुंबईच्या पश्चिम उपनगरात असलेल्या अंधेरीत राहणाऱ्या सुजित दुबेचा एक व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. राज ठाकरे से हमारी दुश्मनी है, असं म्हणत सुजीतनं मनसे प्रमुखांना दारुच्या नशेत शिवीगाळ केली. त्याचा व्हिडीओ व्हायरल होताच मनसेचे कार्यकर्ते आक्रमक झाले. महाकाली रोडवरील सुंदर नगर परिसरात सुजीत दुबे एक वॉशिंग सेंटर चालवतो. हे सेंटर अनधिकृत आहे. त्याचा तोडफोड मनसेच्या माथाडी कामगार विभागाच्या कार्यकर्त्यांनी केली.

पान १ वरून...,

## नांदेड शहर–सुरक्षित शहर...


कारवाई करण्याबाबत आदेशित केलेले आहे. त्यांच्या सूचनेप्रमाणे व अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, विभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे भाग्यनगरचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, पोउपनि सचिन सोनवणे, विनोद देशमुख व स्टाफ तसेच स्ट्रीट सेफ्टी पथकाचे सपोनि नागरगोजे, पोउपनि दर्शने यांनी शुक्रवार, दि. २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी भाग्यनगर हद्दीमध्ये कोचिंग क्लासेस एरियामधील ७ कॅफेची तपासणी केली असून, त्यातील CROWN Cafe व SORRISO Cafe यामध्ये अनियमतता दिसून आल्याने त्यांचे मालकांना पोलीस ठाण्यात आणून नोटीसेस देण्यात आल्या आहेत. तसेच सर्व कॅफे चालकांना पूर्ण कॅफे सीसीटीव्हीच्या निगराणीखाली ठेवण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच भाग्यनगर पोलीस ठाणे हद्दीतील रेन फॉरेस्ट या लॉजची तपासणी शनिवार, दि. २३ रोजी १०.३० वाजताचे सुमारास केली असता लॉजमध्ये ५ महाविद्यालयीन जोडपे मिळून आले आहेत. त्याबाबत लॉज मालक याने रजिस्टरवर त्या मुला–मुलींची नावे नोंदवली नाहीत. तसेच आधार कार्ड घेतले नसल्याचे दिसून आले असून, लॉजमध्ये रूम उपलब्ध करून देताना ग्राहकाचे नाव नोंदवणे, ओळखपत्र घेणे आवश्यक असताना लॉज चालक याने अनियमितता केल्याचे दिसून आल्यामुळे लॉज चालक योगेश रमेश कोटावार रा. पावडेवाडी ता.जि. नांदेड याचेविरुद्ध गु.र. नं. ४७५/२०२५ कलम २२३ बीएनएसप्रमाणे गुन्हा नोंदवून कारवाई करण्यात आली आहे. तसेच लॉज सील करण्यासाठी मनपा नांदेड यांना कळविण्यात येणार असून, लॉजमध्ये मिळून आलेल्या मुलांचे पालकांना बोलावून मुले–मुली यांचे समुपदेशन करून पालकांचे ताब्यात देण्यात आले आहेत. आज मालेगाव रोडवरील रेन फॉरेस्ट या लॉजवर गुन्हा नोंदवून कारवाई करण्यात आली असून, यापूर्वी देखील पोलीस ठाणे माहूर, सोनखेड, भाग्यनगर, वजिराबाद या पोलीस ठाणे हद्दीत हॉटेल, लॉजेस विरुद्ध गुन्हे नोंदवून कारवाई करण्यात ओली आहे.

तरी नांदेड शहर व परिसरातील कुठल्याही लॉज अगर कॅफेमध्ये काही गैरप्रकार चालत असल्याची नागरिकांना माहिती मिळाल्यास नागरिकांनी डायल ११२ वर किंवा संबंधित पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी किंवा स्ट्रीट सेफटी पथकाचे प्रभारी सपोनि नागरगोजे मो. क्र. ८९९९३११९४७ यांना कॉल करून माहिती द्यावी. सदर ठिकाणी कारवाई करण्यात येईल, असे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कळविले आहे.

## पालकमंत्री अतुल सावे...

ता. मुखेड जि. नांदेड येथे आगमन व अतिवृष्टी झालेल्या भागाची पाहणी. सोईनुसार मुक्रमाबाद ता. मुखेड येथून शासकीय विश्राम-गृह, नांदेडकडे वाहनाने प्रयाण. सोईनुसार शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आगमन व राखीव. सोईनुसार शासकीय विश्रामगृह नांदेड येथून छत्रपती संभाजीनगरकडे वाहनाने प्रयाण करतील.

# समृद्धी महामार्गावर धक्कादायक लूट; व्यापाऱ्याचे पावणे पाच किलो सोने लंपास



**बुलढाणा:** पोळा सणाच्या संध्याकाळी समृद्धी महामार्गावर एका व्यापाऱ्याला लुटल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. खामगावहून मुंबईला जाणाऱ्या व्यापाऱ्याकडून तब्बल पावणे पाच किलो सोने लुटण्यात आले असून, यामागे त्याचाच चालक असल्याचा पोलिसांना संशय आहे.

खामगाव येथील व्यापारी अनिल शेशमलजी जैन चौधरी हे त्यांच्या गाडीने मुंबईकडे जात होते. फर्दापूर टोल नाका ओलांडल्यावर त्यांच्या चालकाने 'पोट खराब झाल्याचे' कारण देत गाडी रस्त्याच्या कडेला थांबवली. त्याचवेळी, त्यांच्या पाठीमागून आलेल्या एका चारचाकी गाडीतून ४ ते ५ दरोडेखोर बाहेर आले. त्यांनी अनिल जैन यांच्या डोळ्यात मिरचीची पूड फेकली, चाकूचा धाक दाखवला आणि त्यांच्याकडील सोन्याने भरलेली बॅग हिसकावली. या बॅगेत सुमारे पावणे पाच किलो सोने होते.

या घटनेतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, व्यापाऱ्याचा चालकही या कटात सामील होता. त्यानेच दरोडेखोरांना मदत केली. सोने असलेली बॅग घेऊन तो दरोडेखोरांच्या गाडीत बसला आणि सर्वजण मालेगावच्या दिशेने पळून गेले. या घटनेची माहिती मिळताच मेहकर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, दरोडेखोरांची गाडी मालेगाव टोल नाका ओलांडून पातुरच्या दिशेने गेल्याचे दिसून आले. सध्या पोलीस या दरोडेखोरांचा कसून शोध घेत आहेत.

या घटनेमुळे समृद्धी महामार्गावर वाढलेल्या लूटमारीच्या घटना पुन्हा एकदा अधोरेखित झाल्या आहेत. अपघात कमी झाले असले तरी गुन्हेगारीच्या घटना वाढल्याने प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण आहे. जखमी व्यापारी अनिल जैन यांच्यावर सध्या उपचार सुरु आहेत.

## करचुकवेगिरी प्रकरणात दोन जणांना अटक

**मुंबई**–महाराष्ट्र जीएसटी विभागाने देवरा एक्झिम एलएलपी या फर्मचे भागीदार मेहुल जैन व ऑपरेटर कमलेश जैन यांना ३० कोटी ५२ लाख रुपयांच्या करचुकवेगिरी प्रकरणात अटक केली. आरोपींनी चुकीची इनपुट टॅक्स क्रेडिट वजावट घेतल्यामुळे शासनाची महसूल हानी झाली. न्यायालयाने त्यांना ४ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.

कारवाईदरम्यान व्यापाऱ्याने चुकीची इनपुट टॅक्स क्रेडिट वजावट केल्यामुळे शासनाची महसूल हानी झाल्याचे आढळून आले. राज्यकर सहआयुक्त संजय पवार आणि उपायुक्त स्वप्नाली जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सतीश पाटील, शरदचंद्र पोहनकर, भूपेन्द्र वळवी, मनोहर कनकदंडे यांनी ही कारवाई केली.

संबंधित आरोपी करदात्याची कृती महाराष्ट्र वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ व संबंधित नियमांचे सरळ उल्लंघन आहे. अतिरिक्त मुख्य न्यायिक दंडाधिकारी, मुंबई यांनी आरोपींना ०४ सप्टेंबर २०२५ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

# जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ साठी नाव नोंदणी करून स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**मुंबई**–शांघाई (चीन) येथे आयोजित जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करिता जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवरून प्रतिभासंपन्न, कुशल उमेदवारांचे नामांकन करण्याच्या दृष्टीने मुंबईतील इच्छुक असणाऱ्या पात्र उमेदवारांनी https://skillindiadigital.gov.in/ qH$dm https://kaushalya.mahaswayam.gov.in/Users/ या लिंकवर भेट देऊन आपली नाव नोंदणी करून या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगरचे सहायक आयुक्त शैलेश भगत यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

जागतिक कौशल्य स्पर्धा दर दोन वर्षांनी होते आणि ही जगातील सर्वात मोठी व्यवसायिक शिक्षण आणि कौशल्य उत्कृष्टता स्पर्धा असून जगभरातील २३ वर्षांखालील तरुणांकरिता त्यांच्यातील कौशल्य सादर करण्याची ही ऑलिम्पिक खेळासारखीच स्पर्धा आहे. ही स्पर्धा यापूर्वी ४७ जागतिक कौशल्य स्पर्धेमध्ये ६३ सेक्टर मधून ५० देशातील दहा हजारहून जास्त उमेदवार समाविष्ट असून ही स्पर्धा १५ देशात १२ आठवड्यासाठी आयोजित करण्यात आली होती.

यापुढील जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ ही शांघाई (चीन) येथे आयोजित होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन जिल्हा, विभाग, राज्य आणि देश पातळीवर करण्यात येणार असून स्पर्धेत निवड केलेल्या उमेदवारांची नावे पुढील जागतिक नामांकनासाठी पाठविण्यात येणार आहेत.

जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ करीता वयोमर्यादा हा एकमेव निकष ठरविण्यात आलेला आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी ५० क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी, २००४ किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे. तसेच, Digital Construction, Cloud Computing, Cyber Security, ICT Network Infrastructure, dditive Manufacturing, Industrial Design Technology, Industry 4.0, Mechatronics, Optoelectronic Technology, Robot Systems Integration, Water Technology, Dental Prosthetics, ircraft Maintenance या क्षेत्राकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी, २००१ किंवा तद्नंतरचा असणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने जागतिक कौशल्य स्पर्धा २०२६ स्पर्धेसाठी निश्चीत करण्यात आलेल्या क्षेत्रांची यादी संकेतस्थळावर पाहता येईल.

तसेच स्पर्धेचे सविस्तर वेळापत्रक नोंदणी केलेल्या उमेदवारांना यथावकाश कळविण्यात येईल, तसेच काही अडचणी असल्यास अधिक माहितीसाठी उमेदवारांनी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर १७५ श्रेयस चेंबर, १ ला मजला, डॉ.डी.एन. रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी ०२२–२२६२६४४० यावर संपर्क करावा, असे आवाहन प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

# महागणेशोत्सवात सर्व नागरिकांनी सहभाग नोंदवावा

## ■ सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांचे आवाहन
## ■ महागणेशोत्सव राज्य उत्सवानिमित्त गीत व पोर्टलचे लोकार्पण

**मुंबई**–सार्वजनिक गणेशोत्सव, घरगुती गणेशोत्सव, या महाराष्ट्रातील गणेशोत्सव–ला आता राज्याने प्रथमच महाराष्ट्र राज्याचा राज्य महोत्सव म्हणून घोषित केला आहे. त्यानिमित्ताने सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणाऱ्या विभागांनी विविध उपक्रम, कार्यक्रम, उत्सव तसेच स्पर्धेचे आयोजन केले आहे. याचाच भाग म्हणून राज्यातील प्रत्येक नागरिकास घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सवाचे दर्शन मिळावे, यासाठी सर–पशीहेीरीं.श्रिवाझर.ले.ळप या पोर्टलची निर्मिती करण्यात आली असून सामान्य नागरिकांनी तसेच दिव्यांग बांधवांनी याद्वा–रे घरबसल्या दर्शनाचा लाभ घ्यावा आणि आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांनी केले.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड.शेलार यांच्या हस्ते एमएसआरडीसी, वांद्रे येथे आला रे आला राज्य महोत्सव आला या गीताचे आणि सरपशीहेीरीं.श्रिवाझर.ले.ळप या पोर्टलचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नैनुटिया, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे संचालक विभिषण चवरे उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्र राज्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा आता तालुकास्तरापर्यंत विस्तारित करण्यात आली असून विजेत्यांना देण्यात येणाऱ्या पोरितोषिकांच्या रकमांमध्येही भरघोस वाढ करण्यात आली आहे. राज्यस्तरीय प्रथम विजेत्याला रूपये ७.५० लाख तर जिल्हास्तरावरील प्रथम विजेत्यास रूपये ५० हजार आणि तालुकास्तरीय विजेत्यांना रूपये २५ हजार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. याकरिता प्रवेश अर्जाची ऑनलाईन प्रक्रिया उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्याचबरोबर, खुल्या गटातून महसूल विभागीय स्तरावर व राज्यस्तरावर रील बनविण्याची स्पर्धा होणार असल्याची घो–षणाही त्यांनी यावेळी केली.

भजनी मंडळांना भांडवली अन–दान देण्याची योजना असल्याचे सांगत सांस्कृतिक कार्य मंत्री ड.शेलार म्हणाले की, १८०० भजनी मंडळांना प्रत्येकी २५ हजार रूपये यानुसार भांडवली अनुदान वितरित करण्यात येणार आहे. यासाठीचे अर्ज २३ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या दरम्यान https://mahaanudan.org या वेबसाईटवर उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर व्याख्यानमाला, आध्यात्मिक नाट्यरंग महोत्सव, ड्रोन शो, टपाल तिकिटे, चौकांचे सुशोभीकरण, विद्युत रोशणाई अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वतीने सांस्कृतिक कार्य मंत्री ड.शेलार यांनी राज्यातील सर्व जनतेला गणरायाच्या आगमनाच्या शुभेच्छा दिल्या.

## अमेरिकेकडे जाणारी टपाल सेवा तात्पुरती बंद

**मुंबई :** भारताच्या पोस्ट विभागाने अमेरिकेकडे जाणारी सर्व प्रकारची टपाल सेवा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिकेने भारतीय वस्तूंवर ५० टक्के टॅरिफ लावल्याने आणि नवीन कस्टम्स नियम लागू केल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

३० जुलै २०२५ रोजी अमेरिकेने नवीन कस्टम निर्णय जारी केला. याअंतर्गत २९ ऑगस्टपासून ८०० डॉलर्सपर्यंतच्या वस्तूंवरील शुल्कमुक्त सवलत रद्द करण्यात आली आहे.

म्हणजेच आता अमेरिकेत जाणाऱ्या प्रत्येक आंतरराष्ट्रीय पोस्ट वस्तूंवर शुल्क आकारले जाईल. मात्र, १०० डॉलर्सपर्यंतच्या गिफ्ट वस्तूंना शुल्कातून सवलत मिळणार आहे.


खुश खबर खुश खबर खुश खबर

**प्रवेश देणे चालू आहे**

(सरकार मान्य)

**नॅशनल औद्योगिक प्रशिक्षण संस्था**

माळटेकडी रेल्वेफ्लाय ओहरजवळ नांदेड या संस्थेत Electrician, Wireman, MMV, FITTAR & Welder या व्यवसायात प्रवेश देणे चालू आहे. दिनांक २५/८/२०२५ पासून समुपदेशन फेरी सुरू होत आहे. गरजूंनी त्वरित संस्थेशी संपर्क साधावा व या संधीचा लाभ घ्यावा. संपर्क– ९०२८९८२४५१, ७६२००७६०२४

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबान ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.


# गोदातीर समाचार


**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## बहुजनांचा सन्मान, शेतकऱ्यांसाठी लढाई, युवक बेरोजगारांसाठी मंडल यात्रा -राजापूरकर

**नांदेड (प्रतिनिधी)**- राज्यातील बहुजनांच्या सन्मानासाठी, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर लढाई उभारण्यासाठी, महिला अत्याचार विरोधात आणि बेरोजगार युवकांना काम मिळावे म्हणून शासनाला जागे करण्यासाठी ९ ऑगस्ट रोजी नागपूर येथून मंडल यात्रा काढण्यात आली आहे. परंतु या यात्रेला महायुती सरकारकडून जागोजागी अडथळे निर्माण करण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राजा राजापूरकर यांनी नांदेड येथे केला.



९ ऑगस्ट क्रांतीदिनी नागपूर येथून सुरू झालेली ओबीसींच्या न्याय हक्कासाठी, बहुजनांच्या सन्मानासाठी, शेतकऱ्यांसाठी, महिलांसाठी, युवा बेरोजगारांसाठी मंडल यात्रा २३ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर शासकीय विश्रामगृह येथे मंडल यात्रेचे प्रमुख राजा राजापूरकर यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

राज्यातील ३६ जिल्ह्यांत ही यात्रा जाऊन १४ हजार ८२२ किलोमीटरचा प्रवास करणार आहे. सन १९९३ राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी मंडल आयोगामार्फत ओबीसीला आरक्षण देण्याची घोषणा केली. खऱ्या अर्थाने शरद पवार हे ओबीसींचे मसीहा आहेत. त्यासोबतच व्ही. पी. सिंग यांनाही विसरता येणार नाही. परंतु काही ओबीसींचे स्वयंघोषित नेते भाजपाच्या मांडीवर जाऊन बसलेत आणि तेच ओबीसी आरक्षणाला थेट विरोध करत आहेत. अशा नेत्यांची येणाऱ्या काळात समाज गाठ घेणार असल्याचेही राजापूरकर यांनी सांगितले. भाजप ओबीसी आमचा डीएनए आहे असे छाती ठोकून सांगतात, परंतु ते ओबीसी समाजाची दिशाभूल आणि फसवणूक करीत आहेत. ओबीसींचा वापर आतापर्यंत त्यांनी मतासाठी केला आहे, परंतु यापुढे ओबीसी भाजपाच्या भूलथापांना बळी पडणार नाही असे राजापूरकर यांनी सांगितले.

मंडल आयोगाला सर्वात प्रथम विरोध तत्कालीन उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांनी करत कमंडलच्या माध्यमातून बहुजनांचे लक्ष विचलित करण्यासाठी यात्रा काढली होती, परंतु आता ओबीसी जागा झाला असल्याचे राजापूरकर म्हणाले. ४२ दिवस ही यात्रा चालणार असून, जागोजागी यात्रेला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे परंतु ओबीसींच्या आरक्षणातून आरक्षण देता येणार नाही, असा इशाराही मनोज जरांगे पाटील यांना राजापूरकर यांनी दिला आहे.

नांदेडमध्ये आल्यानंतर येथील सर्व महापुरुषांना अभिवादन करण्यात आले. सचखंड गुरुद्वाराचे दर्शन घेतले. पक्षाच्या कार्यकर्त्यांसोबत बैठक घेऊन त्यांनी पत्रकारांनाही संबोधित केले. १८ सप्टेंबर रोजी मुंबई येथे यात्रेचा समारोप होणार असून, देशातील विविध पक्षातील महत्त्वाचे नेते या समारोप प्रसंगी उपस्थित राहणार आहेत, असेही राजा राजापूरकर यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला माजी मंत्री सूर्यकांता पाटील, डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर, जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, डॉ. सुनील कदम यांची उपस्थिती होती.

## मुखेड नगर परिषदेत थेट नगराध्यक्षासह २० नगरसेवक असणार

**नांदेड (प्रतिनिधी)**- गत साडे तीन वर्षांपासून रखडलेल्या नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू होत असल्याचे चिन्ह दिसून येत आहे. न. प. ची प्रारूप प्रभाग रचना दि. १८ ऑगस्ट रोजी नगर परिषद कार्यालयात जाहीर करण्यात आली आहे. सूचना फलकावर ही प्रभाग रचना लावण्यात आली असून, दावे, हरकतीसाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत आहे.

मुखेड न. प. ही क दर्जाची आहे. प्रारूप प्रभाग रचनेनुसार १० प्रभाग करण्यात आले आहेत. यात प्रत्येक प्रभागात २ सदस्य राहणार आहेत. नव्या सभागृहात एकूण २० नगरसेवक असतील. नगराध्यक्षांची निवड थेट जनतेतूनच होणार आहे. प्रारूप रचनेनंतर प्रभाग रचना अंतिम होणार असून, नंतर न. प. सदस्य व नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर होणार आहे. २०११ च्या जनगणनेनुसार निवडणूक होणार आहे. शहरातील लोकसंख्या २७ हजार ६५० आहे. ह्यात अनुसूचित जाती ४ हजार २४१ तर अनुसूचित जमाती २ हजार ४१६ असे नमूद केले गेले आहे. प्रभाग क्रमांक १ कौठा रोड वाल्मीकनगर बस स्टँड पाठीमागील भाग साईनाथ नगर प्रभाग क्रमांक २ फुलेनगर, व्यंकटेशनगर, फुलेनगर पश्चित बाजू, मुखेड नांदेड मार्गावरील डावी बाजू. प्रभाग क्रमांक ३ व्यंकटेशनगर, अशोकनगर. श्रीनगर, प्रभाग क्रमांक ४ मुखेड ते नांदेड मार्गावरीलल उजवी बाजू, शिवाजी नगर, सरस्वतीनगर, दीपनगरचा काही भाग, ४ गणेश नगर, प्रभाग क्रमांक ५ तबेला गल्ली जुनी पोलीस कॉलनी तहसील ऑफिसचे पाठीमागील भाग दत्तमंदिर गल्ली, प्रभाग क्रमांक ६ मनोहर टॉकीज गल्ली बालाजी मंदिर गल्ली वडार गल्ली नवी आबादी, प्रभाग क्रमांक ७ महाकाली गल्ली हेडगेवार चौक, कोळी गल्ली धोबी गल्ली, प्रभाग क्रमांक ८ जुने पोलीस स्टेशन बारव गल्ली महादेव मंदिर परिसर, मोमीन गल्ली, प्रभाग क्रमांक ९ वीरभद्र मंदिर गल्ली, होळकर नगर, वेताळ गल्ली फॉरेस्ट ऑफिस परिसर, प्रभाग क्रमांक १० गायत्री गल्ली संत गाडगेबाबा नगर भवानी मंदिर परिसर अन्नाभाऊ साठे नगर, गवळी गल्ली परिसर आदी हद्द व्याप्तीचे वर्णन असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. आता मुखेड न. प. मध्ये १० प्रभागातून २० नगरसेवक निवडून द्यावे लागणार आहेत. गत साडे तीन वर्षांपासून न.प. वर प्रशासकराज आहे.

## कर्जबाजारी मुलाने आत्महत्या केल्यानंतर दोन दिवसांत आईनेही सोडले प्राण

**नांदेड (प्रतिनिधी)**- मागील आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले. पुराच्या पाण्यात शेतातील पिके वाहून गेली. हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिरावल्याने हताश झालेल्या शेतकऱ्याने गळफास घेत जीवन संपवल्याची घटना नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील फुलवळ येथे उघडकीस आली आहे. सूर्यकांत मंगनाळे असे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव असून, त्याने शेतातच गुरुवारी गळफास घेवून आत्महत्या केली होती. तरुण मुलाच्या दुःखाच्या विरहाने शुक्रवारी आईनेही प्राण सोडले. मायलेकाच्या मृत्यूमुळे फुलवळ गावावर शोककळा पसरली आहे.

देऊबाई मंगनाळे असे मयत आईचे नाव आहे.



नापिकी, कर्ज त्यातच अतिवृष्टीने पिकांची नासधूस झाली. सर्व पीक अतिवृष्टीत वाहून गेले. हे सर्व पाहून हताश झालेल्या अल्पभूधारक शेतकरी सूर्यकांत लक्ष्मणराव मंगनाळे (वय ४६) याने शेतातच गळफास घेवून आपली जीवनयात्रा संपवली. शोकाकुल वातावरणात त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मुलाच्या मृत्यूनंतर त्याचा विरह सहन न झाल्याने आई देऊबाई मंगनाळे यांनीही शुक्रवारी सकाळी प्राण सोडला. गुरुवारी मुलावर तर शुक्रवारी ऐन पोळ्याच्या दिवशी आईवर अंत्यसंस्कार करण्याची वेळ आली. देऊबाई मंगनाळे यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, दोन सुना, नातवंडे असा परिवार आहे.

बँकेकडून काढलेले कर्ज, पेरणीसाठी सावकाराकडून घेतलेले पैसे कसे फेडावे या विवंचनेतून सूर्यकांत मंगनाळे यांनी आत्महत्या केल्याचे गावकऱ्यांनी सांगितले. सरकारच्या संवेदना आता तरी जाग्या व्हाव्यात आणि शेतकऱ्यांची कर्जमाफी व्हावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी किनवट तालुक्यातील गावांमध्ये भेट देऊन पीक नुकसानीची केली पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)**- मागील आठवड्यात नांदेड जिल्ह्यात सतत पाऊस व अतिवृष्टी होवून अनेक हेक्टर शेतीतील पिके पाण्याखाली गेली आहेत. शेतात पाणी साचल्यामुळे व पैनगंगा नदीच्या पुरामुळे किनवट तालुक्यातील अनेक गावांना पुराचा फटका बसला आहे. या पिकांच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शनिवारी किनवट तालुक्यातील भंडारवाडी, पिंप्री या गावांना भेट देऊन पाहणी केली व शेतकऱ्यांशी संवाद साधला.

यावेळी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सहायक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी जेनित चन्द्रा दोन्तुला, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत निमोड, नायब तहसीलदार फोले, कृषी विभागाचे अधिकारी, परिसरातील शेतकरी आदींची उपस्थिती होती.



किनवट तालुक्यात पैनगंगा नदीच्या पुरामुळे नदीकाठच्या गावात पूरपरिस्थिती निर्माण होऊन कापूस, सोयाबीन व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे सुरू असून, ते तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. तसेच यावेळी त्यांनी किती टक्के पंचनामे करण्याचे काम पूर्ण झाले आहे याचा आढावा घेतला. तसेच सहस्त्रकुंड धबधबा येथे पाहणी केली.

## पूरग्रस्तांच्या मदतीसाठी खा. डॉ. अजित गोपछडेंकडून २० लाखांची मदत

### घाबरू नका सरकार आपल्या पाठीशी असल्याचा दिला विश्वास

**नांदेड (प्रतिनिधी)**- मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद- सह परिसरातील अनेक गावांना पुराच्या पाण्याचा फटका बसला होता. येथे जीवित हानी आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामुळे पूरग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी शनिवारी हसनाळ, रावणगाव या पूरग्रस्त गावांना भेटी दिल्या. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी त्यांनी खासदार निधीतून वीस लाख रुपये जाहीर केले. शिवाय राज्य सरकारकडून आणि केंद्र सरकारकडूनही आपण मदत मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचा विश्वास खा. डॉ. गोपछडे यांनी यावेळी दिला आहे.

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परिसरात झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसाने लेंडी धरणाच्या बुडीत क्षेत्रातील हसनाळ, रावणगाव आदी गावांना पुराच्या पाण्याचा फटका बसला आहे. अतिवृष्टीने पाच जणांचे बळी घेतले तर शेकडो पशुही मृत्युमुखी पडले आहेत.

लाखो हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेल्याने शेतकरी हवालदिल झाला होता. अशा परिस्थितीत पूरग्रस्तांना धीर देण्यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे हे




दिल्लीवरून थेट रावणगाव, हसनाळ येथे पोहचले. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. गावातील घरांची झालेली पडझड समजून घेतली आणि वीस लाख रुपयांची मदत जाहीर केली. शिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखालील राज्य आणि केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या आणि पूरग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. त्यामुळे नागरिकांनी धीर सोडू नये. या नैसर्गिक संकटातून आपल्याला सावरण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत आहे, असे सांगत खा. डॉ. अजित गोपछडे यांनी पूरग्रस्तांना धीर दिला. दरम्यान आपल्या खासदार निधीतून पूरग्रस्तांसाठी संसारोपयोगी साहित्य पुरवठा करण्यात येणार असून यात गॅस सिलेंडर आणि स्वयंपाक उपयोगी भांडी यांचा समावेश असणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, तहसीलदार राजेश जाधव, शादुल पटेल, राजू पाटील रावणगावकर, राम पाटील भाटापूरकार, शिवराम अप्पा हसनाळे, प्रदीप पाटील, तुकाराम सुडके, बालाजी ढोसणे, त्र्यंबक पाटील यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## आधुनिक शाहिरीने समाजजीवनात परिवर्तन घडविले -प्रा. हंसराज जाधव

**नांदेड (प्रतिनिधी)**- आधुनिक शाहिरीने पारंपरिक शाहिरीला नवीन मूल्यभान दिले आणि समाजजीवनात परिवर्तन घडवून आणले. सामाजिक समतेचा दृढ संदेश देत, शाहिरांनी स्वातंत्र्य आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, अस्पृश्यता निर्मूलन आणि जातिभेद विरोधी चळवळींना वेग दिला, असे प्रतिपादन प्रा. हंसराज जाधव यांनी केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा, वाङ्.मय आणि संस्कृती अभ्यास संकुलात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

हे व्याख्यान जागतिक लोकसाहित्य दिनाच्या औचित्याने 'महाराष्ट्रातील आधुनिक लोकशाहिरी' या विषयावर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संकुलाचे संचालक डॉ. दिलीप चव्हाण होते.


यावेळी कलावंत किशोर देशमुख आणि शंकर कापसे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

प्रा. जाधव यांनी पुढे सांगितले की, सत्यशोधक चळवळीने लोकशाहिरीचे सामाजिक महत्त्व ओळखून अन्यायकारक प्रथा व रूढींविरुद्ध प्रभावी जनजागरण केले. सत्यशोधक जलसे आणि शाहिरीतून समाजजागृतीस चालना मिळाली. मनोरंजनाऐवजी प्रबोधनावर त्यांनी भर दिल्यामुळे सामाजिक परिवर्तनाला मोठे बळ मिळाले.

समाजबदलासाठी स्वतःचे आयुष्य झोकून देणाऱ्या या लोककलावंतांना हलाखीच्या परिस्थितीत जगावे लागत आहे. त्यामुळे अशा कलावंतांविषयी समाजाने आणि सरकारने कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक आहे, असे मत प्रा. जाधव यांनी व्यक्त केले. लोकजीवनावर संशोधन करून सामाजिक बांधिलकी जोपासली पाहिजे, असे मत भाषा संकुलाचे संचालक डॉ. दिलीप चव्हाण यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला डॉ. पी. विठ्ठल, डॉ. पृथ्वीराज तौर, डॉ. योगिनी सातारकर, डॉ. वैजनाथ अनमुलवाड, डॉ. नीना गोगटे, डॉ. प्रशांत घोडवाडीकर यांच्यासह विद्यार्थी व संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी केले. व्याख्यानावर साधकबाधक चर्चा होऊन व्याख्यानाची सांगता झाली.

## एमआयडीसीच्या गलथान कारभारामुळे नांदेड विमानतळ बंद पडले -प्रकाश मारावार

**नांदेड (प्रतिनिधी)**- शहराच्या मध्यभागी बहुचर्चित असलेले नांदेड विमानतळ एमआयडीसीच्या गलथान कारभारामुळे बंद पडले आहे. विमानतळ बंद पाडण्याला उद्योगमंत्री उदय सामंत हेच जबाबदार आहे, असा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख प्रकाश मारावार यांनी केला.



नांदेड विमानतळ अनेक वर्षांपासून रिलायन्स समूहाच्या ताब्यात होते. महाराष्ट्राचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी रिलायन्स समूहाला वेठीस धरून नांदेड विमानतळ रिलायन्सकडून काढून घेतले. उद्योग मंत्राच्या अख्त्यारीत असलेल्या एमआयडीसीला चालविण्यास दिले. वास्तविक पाहता एमआयडीसीच्या निष्काळजीपणामुळे अनेक उद्योगधंदे बंद पडत आहेत. उद्योगाला चालना देण्याऐवजी भूखंडाचे श्रीखंड कशाप्रकारे होईल याच्यातच एमआयडीसीचे अधिकारी मश्गुल आहेत. असे असताना विमानतळ चालवण्याचा अनुभव एमआयडीसीला शून्य असताना नांदेड विमानतळ एमआयडीसीला चालविण्यासाठी दिलेच कसे, असा सवालही मारावार यांनी केला. एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना नांदेड विमानतळाचं काही घेणं देणं नव्हतं. एमआयडीसीच्या गलथान कारभारामुळे नांदेड विमानतळ बंद पडले असून, याला उद्योग मंत्री उदय सामंत जबाबदार असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महानगर प्रमुख प्रकाश मारावार यांनी म्हटले आहे.

## युवा ग्रुप आयोजित दहीहंडी लोह्याच्या जय बजरंग मंडळाने फोडली

### नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या अदाकरीवर तरूणाई थिरकली

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)**- युवा ग्रुपचे सतीश बसवदे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित दहीहंडी महोत्सवाचे पहिले पारितोषिक लोहा येथील जय बजरंग मंडळ यांनी पाच थराच्या सहायाने थर रचून दहीहंडी फोडून पारितोषिक मिळविले. यावेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या अदाकारीवर हजारो तरुणाई थिरकली. या महोत्सवाला प्रथमच हजारो महिला सहभागी झाल्या होत्या.

सिडको-हडको परिसरात गेल्या अनेक वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील युवा ग्रुपच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्रातील प्रसिद्ध नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या कार्यक्रमाचे आयोजन हडको येथील मैदानावर करण्यात आले होते. यावेळी नामांकित जवळपास सात संघांनी नोंदणी केली होती. यात



नांदेड येथील जय बजरंग मंडळ चिखलवाडी, राम राज्य सांगवी, पंचशील चौफाळा, संस्कृती मंडळ भोईगल्ली नांदेड यांच्यासह लोहा येथील जय बजरंग ९५१२, कंधार येथील सीता गणेश मंडळ व परभणी साठे कॉर्नर मंडळ यांचा समावेश होता. यावेळी प्रत्येक संघाने सलामी दिली. लोहा येथील जय बजरंग मंडळाने दहीहंडी फोडून २२,२२२ रुपयांचे पारितोषिक पटकाविले. सोहळ्याचे उद्घाटन नांदेड भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष माजी आमदार अमर राजूरकर यांच्यासह आ. श्रीजया चव्हाण, माजी आमदार डी. पी. सावंत, देविदास राठोड, भाजपा नांदेड दक्षिण विधानसभा प्रमुख डॉ. सचिन उमरेकर, माजी महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, प्रवीण साले, माजी जि. प. सदस्य मनोहर शिंदे, भाजपा मंडळ अध्यक्ष सचिन रावका, विश्वंभर शिंदे, भालचंद्र पवळे, अमित वाघ, युवा मोर्चा अध्यक्ष शशिकांत क्षीरसागर यांच्यासह माजी नगरसेवक संजय इंगेवाड, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख, राजू पाटील घोगरे, नगरसेवक राजू पाटील काळे, राजू गोरे, माजी नगरसेवक सिध्दार्थ गायकवाड, वैजनाथ देशमुख, राज लांडगे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी दहीहंडी महोत्सवात प्रथम आलेल्या जय बजरंग मंडळ लोहा यांना पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

या दहीहंडी महोत्सवात नृत्यांगना गौतमी पाटील यांच्या पाटलांच्या बैलगाडा यासह अनेक सुप्रसिद्ध लावणी गितावर तरूणाई थिरकली. विशेष हजारो महिलांसह, युवक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चला हवा येऊ द्याचे हास्य कलाकार सतिश कासेवार यांनी केले. ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बालासाहेब रोकडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे, विजय कांबळे, उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड, बाबुराव चव्हाण यांच्यासह पोलीस कर्मचारी, महिला कर्मचारी, होमगार्ड व अतिरिक्त पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कार्यक्रम यशस्वीतेसाठी युवा ग्रुपचे अध्यक्ष सतिश पाटील बस्वदे व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com